# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०६ एप्रिल, २०१६ / चैत्र १७, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १००**

---

### परभणी येथील मुस्लीम धार्मिक जत्रा (ऊर्स) बंद पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत

**(१) * १५०३० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ११७८२ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुस्लीम धार्मिक जत्रा (ऊर्स) असणाऱ्या परभणी येथील हजरत तुराबुल हक साठी देण्यात आलेल्या पोलीस बंदोबस्तासाठी ९० लक्ष रूपयांची वसुली नोटीस रद्द करून मुस्लीमांचे धार्मिक कार्यक्रम बंद पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने चालवलेल्या षडयंत्राची चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य सचिव व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सादर केलेल्या लेखी निवेदनातील सर्व मुदयांची मुददे निहाय चौकशी करून चुकीच्या पध्दतीने देण्यात आलेली वसुली नोटीस रद्द करणे तसेच पोलीस अधीक्षक, परभणी व उपसचिव, गृह विभाग यांच्या गैरकारभाराची निवृत्त जिल्हा न्यायाधिशांकडून चौकशी करण्यात आली वा येत आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निदर्शनास झाले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर विषयाबाबत मा.मुख्य सचिव यांचेकडे दिनांक १३.१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेले निवेदन गृह विभागास प्राप्त झाले आहे. याबाबत पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून चौकशी करुन तसेच आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कंबाटा एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या व्यवस्थापनाने कामगारांच्या पतपेढीत भरण्यात येणाऱ्या पैशामध्ये केलेला अपहार**

**(२) * १४८५२ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे : तारांकित प्रश्न क्रमांक १०१६१ ला दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ग्राऊंड हॅन्डलिंग कंपनी म्हणून विविध आंतरराष्ट्रीय विमानांना सेवा पुरविणाऱ्या कंबाटा एव्हिएशन प्रा. लि. व्यवस्थापनाने कामगारांच्या पतपेढीत कोट्यवधी रुपयांचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगारांची महिन्याला ४५ लाखांची रक्कम पगारातून पतपेढीसाठी कापली जात असताना अनेक महिन्यांपासून त्याचा भरणा पतपेढीत होत नसल्याचे व व्यवस्थापनातील सदस्यांनी कंपनीमध्ये गैरप्रकार केलेले असून भविष्य निर्वाह निधी, एलआयसी याचा अंदाजे रुपये १.५ कोटी प्रिमिअमचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित गैरव्यवहार प्रकरणी कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्यास पोलिसांकडून टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास कोणत्याही प्रकारची टाळाटाळ झालेली नसुन ज्या ज्या वेळी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत तेव्हा संबंधित कंपनी विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदर कंपनीचे संचालक व इतर यांच्याविरुद्ध सहार पोलीस ठाणे येथे खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

(१) गुरक्र. २३०/१३ कलम ४०६, ४०९, ३४ भादंवि

(२) गुरक्र. ३३६/१४ कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ भादंवि

(३) गुरक्र. ११५/१५ कलम ४०६, ४०९, ३४ भादंवि

(४) गुरक्र. २६८/ १५ कलम ४०६, ३४ भादंवि वरील नमुद अनुक्रमांक १ व २ यांचे दोषारोपपत्र मा.अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले असून उर्वरीत अनुक्रमांक ३ व ४ यांचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या अतिक्रमण केलेल्या जमिनींवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत

**(३) * १४६८० श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या वसाहती व भूखंडाना अतिक्रमणाचा विळखा पडू नये यासाठी सुरक्षा यंत्रणावर आजतागायत सुमारे रुपये १८ कोटी एवढा खर्च करुनही म्हाडाला अतिक्रमणावर निर्बंध घालता आले नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढा खर्च करुनही ८४ हून अधिक भूखंडावर अतिक्रमणे झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे ९४ हून अधिक अतिक्रमण झालेल्या भूखडांवर सन २०११ मध्ये म्हाडाने एसआरए योजना राबविण्याचा निर्णय घेतला असतानाही आता मात्र विकासकांच्या दबावामुळे हा निर्णय बदलण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे मुंबईत जमिनी शिल्लक नसल्याने आता म्हाडाने रायगड, ठाणे जिल्ह्यांकडे परवडणारी घरे बांधण्यासाठी लक्ष वेधले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अतिक्रमणे झालेल्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवून मुंबईत सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार मुंबईतील म्हाडाच्या सर्व वसाहतींमधील रिक्त भुखंडावर अतिक्रमण होऊ नये याकरिता सुरक्षा यंत्रणा नेमण्यात येते. त्याकरिता सन २००५ ते फेब्रुवारी, २०१६ पर्यंत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाअंतर्गत सुमारे १८ कोटी एवढा खर्च सुरक्षा व देखभालीकरिता झालेला आहे. यापैकी बहुतांश अतिक्रमणे सन १९९५ ते २००० या कालावधीतील असल्याचे आढळून येते व सदरच्या संरक्षणपात्र झोपड्यांच्या जमिनीवर झोपडपट्टी वसाहतींमध्ये नव्याने अतिक्रमण होऊ नये याकरिता विविध ठिकाणी मोकळ्या भूखंडाच्या संरक्षणाकरिता सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. तसेच मोकळ्या जागा/भूखंडावर संरक्षण भिंती बांधण्यात येत आहेत व अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी वेळोवेळी मुंबई महानगरपालिका कायदा MRTP Act अंतर्गत महानगरपालिकेच्या सहाय्याने कार्यवाही केली जाते.
(३) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरणाकडे परिशिष्ट-२ जारी करण्यासाठी ९६ प्रस्ताव प्रलंबित असून त्या योजनांचे परिशिष्ट-२ अंतिम करुन ३ महिन्यांच्या कालावधीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविण्याबाबत दि.१.१२.२०१४ च्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकीत निर्णय झालेला आहे. त्या अनुषंगाने म्हाडा प्राधिकरणाने दिनांक २५.६.२०१५ अन्वये आजतागायत ५२ प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविले असून उर्वरित प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) म्हाडाच्यावतीने उपलब्ध भुखंडावर घर बांधणी योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येतात.
(५) याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून योजना राबविण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी महत्वकांक्षी प्रकल्प असणारी भामा-आसखेड योजना सुरु करण्याबाबत**

**(४) * १५६३७ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी महत्वाकांक्षी प्रकल्प असणारी भामा-आसखेड योजनेबाबत निविदा काढून कामाची सुरुवात झाली परंतु, सध्या ही योजना रखडली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर योजना धरणग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्याने रखडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणग्रस्तांचे पुनर्वसन व सदरील योजना सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) भामा आसखेड प्रकल्पातील एकूण १४१४ प्रकल्पग्रस्तांपैकी १११ प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी जमिनीसाठी ६५% रक्कम भरलेली असून, त्यापैकी ११० प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यात आलेली असून, उर्वरित १ प्रकरणात जमीन मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(३) वर नमूद १११ प्रकल्पग्रस्तांच्या व्यतिरिक्त १३०३ प्रकल्पग्रस्तांनी ६५% रक्कम कपात करुन दिलेली नाही. त्यामुळे सदर प्रकल्पग्रस्त पर्यायी जमीन मिळण्यास पात्र ठरत नाहीत. तथापि, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना निदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली शहरातील ले-आऊटमध्ये बदल केल्याबाबत**

**(५) * १४८७२ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील स.नं. ९७ नारायण नगर येथील जागेवर नगर परिषदेने दिनांक १९ मार्च, १९९१ रोजी डिमार्केटेड ले-आऊट मंजुर करुन ३७ प्लॉटला मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ३७ प्लॉटला (सि.सर्वे नं.५२०७) नगर परिषदेने घर नंबर सुध्दा दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेचा मान्यता असलेला मुळ नकाशा व संचिका सन २००५ ते २०१२ या कालावधीत नगर अभियंता, ए.एच. अग्रवाल यांच्या कालावधीत गहाळ झाल्याचे दिनांक ०८ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास नगर परिषदेने जागेच्या मुळ मालकास कळवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संचिका गहाळ झाली तर ॲड.गणेश घुले यांना दिनांक ०६ जुलै, २०१२ रोजी माहितीच्या अधिकारात चुकीचा नकाशा दर्शवुन त्यात १ ते ३० प्लॉट असल्याचे दाखवले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर नकाशात फेरबदल करुन प्लॉट धारकांनी फसवणुक केली, हे खरे आहे काय व ती कोणी केली आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी असणा-यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नारायणनगर हिंगोली येथील सि.स.क्र.९७ (भाग) येथील भुखंड क्र.१ ते ३२ अभिन्यासास संचालक, नगररचना, परभणी यांनी मान्यता दिली आहे. तसेच जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपरोक्त १ ते ३२ भुखंडास अकृषिक परवानगी दिलेली आहे.

तथापि, या भुखंडावर नगरपरिषदेमार्फत क्र.१ ते ३७ भुखंडास मान्यता प्रदान करण्यात आल्याचे व सदर डिमार्केटेड ले-आऊट ज्यामध्ये ३७ प्लॉट दर्शविण्यात आलेले आहेत, अशा या ले-आऊटला सहायक संचालक, नगररचना यांची शिफारस नसल्याचे तसेच या अभिन्यासास जिल्हाधिकारी कार्यालयाची अकृषिक परवानगी नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

(२) सदर भुखंड क्र. ३३ ते ३७ मध्ये इमारत बांधकाम नाही, तथापि, मिळकत नंबर दिले असल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले आहे.

(३) हे खरे आहे.

तथापि, कालांतराने सदरहू संचिका शोधून काढण्यात आली व सध्या सदर संचिका नगरपरिषद कार्यालयाच्या अभिलेख कक्षात उपलब्ध असल्याचे व तसे संबंधीतास कळविल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले आहे.

(४) हे खरे नाही.

ॲड.गणेश घुगे यांना खुल्या ८४० चौ.मी. जागेच्या चतु:सिमा तसेच मालकी नगरपरिषदेची असल्याचे कळविल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले आहे.

(५) मूळ अभिन्यास धारक व इतर यांनी मुळ मंजूर अभिन्यास, ज्यामध्ये भुखंड क्र.१ ते ३२ दर्शविलेले होते, त्यामध्ये फेरबदल करुन नवीन डिमार्केटेड ले-आऊट दुसऱ्यांदा तयार करुन (ज्यामध्ये मुळ अभिन्यासातील खुल्या जागेच्या क्षेत्रफळामध्ये भुखंड क्र.३३ ते ३७ दर्शवून) त्यास तत्कालीन तहसिलदार तथा मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

(६) उपरोक्त संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागात बायोमॅट्रीक सिस्टम वापरणार असल्याबाबत

**(६) * १५४५६ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कामचुकार सफाई कामगारांवर अंकुश ठेवण्याकरीता मेकॅनिकल स्विपिंग पध्दत तसेच बायोमॅट्रीक सिस्टम वापरणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेने आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महापालिकेच्या घनकचरा खात्यातील कामचुकार सफाई कामगारांवर अंकुश घालण्यासाठी मेकॅनिकल स्विपिंग पध्दत वापरणार असल्याची बाब खरी नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांकरिता बायोमॅट्रीक हजेरी पध्दत वापरण्याचे प्रस्तावित आहे.

सद्य:स्थितीत महापालिकेच्या 'बी' विभाग कार्यालय व नायर रुग्णालय येथे प्रायोगिक तत्वावर सदर बायोमॅट्रीक प्रणाली बसविण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. तद्नंतर बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीचा अवलंब करण्याचे काम महापालिकेच्या इतर विभाग कार्यालयात हाती घेण्यात येणार आहे.

(२) व (३) उक्त प्रकरणी निविदा मागविण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वानवडी (पुणे) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

**(७) * १५७३३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानवडी (पुणे) येथील सर्व्हे क्र.१५ मध्ये न्यू कोहिनूर को.ऑप.हौ.सो. व क्रिसेंट इंडिया मेडिकल ट्रस्ट या जागेवर रुग्णालयाचे आरक्षण असल्याने तळ मजला व पहिला मजला महानगरपालिकेला देण्याबाबत झालेला करार परंतु कोणत्याही कराराचे पालन न करता पाच मजल्यांचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून नगरविकास विभागाला सदर रुग्णालयावर कारवाई करण्याकरिता आयुक्त, श्री.कुणाल कुमार यांनी माहे एप्रिल-जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पत्र पाठवून विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच मजल्यांचे अनधिकृत बांधकाम पाडण्यात यावे असा न्यायालयाने आदेश देऊनसुद्धा नगरविकास विभागाने बांधकाम पाडण्यास स्थगिती देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, सदर स्थगिती कोणी दिली व ती देणाऱ्यांविरोधात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, कराराप्रमाणे महापालिकेला जागा देण्यात न येणे, पाच मजल्यांचे बांधकाम अनधिकृतरित्या करणे परवानगीपेक्षा दुप्पट खाटांचा दवाखाना सुरु करणे, न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणे इ.अनेक नियमांचे उल्लंघन करुनही संबंधित इनामदार रुग्णालयाच्या व्यवस्थापना विरोधात तसेच महापालिका आयुक्तांच्या विनंतीनुसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे वानवडी सर्वे नं.१५ या जागेवर विकास आराखड्यामधील हॉस्पिटलचे आरक्षण प्रस्तावित असून अर्जदारास विकास नियंत्रण नियमावलीमध्ये असलेल्या समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकासनाच्या तरतूदीच्या अनुषंगाने २५% बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या अटीसह परवानगी दिलेली आहे. त्यानुसार जागेवर बांधकाम करण्यात आलेले आहे. त्यानुसार जागेवर बांधकाम करण्यात आलेले आहे. विकासकाने वेळोवेळी सुधारित नकाशे दाखल केले असता महानगर पालिकेने सदर जागा ताब्यात घेतलेली नव्हती तव्द्तच सुधारित परवानगी देण्याची विहीत मुदतीत कार्यवाही केली नव्हती. विहीत मुदतीनंतर विकासकाने मानीव परवानगी (Deem Approval) विचारात घेऊन अतिरिक्त मजले बांधल्यावरुन महानगरपालिकेने अधिनियमाचे कलम ५३ अन्वये नोटीस दिली होती.

(२) महानगरपालिकेने अधिनियमाचे कलम ५३ अन्वये अनधिकृत बांधकाम काढण्याची दिलेली नोटीस विरुध्द मा.उच्च न्यायालयात अर्जदाराने याचिका (याचिका क्र. ७०४७/२०१४) दाखल केलेली होती. मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०६/०२/२०१५ रोजी अंतरिम निर्णय देताना शासनाकडे केलेल्या अपिल अर्जाबाबत निर्णय घेण्याचे नमूद केलेले आहे. यासंदर्भात न्यायालयीन आदेशावरुन शासनाकडे दाखल केलेल्या अपील प्रकरणावर राज्यमंत्री महोदयाकडे दिनांक ३/३/२०१५ रोजी प्राथमिक सुनावणी होऊन कलम ५३ अन्वये दिलेल्या नोटीसीला दिनांक १२/३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पुढील निर्णय होईपर्यंत शासनातर्फे स्थगिती दिलेली आहे.

(३) सदरहू प्रकरणाची पुणे महानगरपालिकेचे अधिकारी व सर्व संबंधितांची दिनांक २७/१०/२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान संबंधितांचे निवेदने व विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदी विचारात घेऊन संबंधितांनी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये असलेल्या समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकासनाच्या तरतूदीच्या अनुषंगाने २५% बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत निर्णय पारित करण्यात येत असून त्यावरील स्थगिती उठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचे काम सुरु न झाल्याबाबत**

**(८) * १५३५३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ११४५७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याची कार्यवाही गत अनेक वर्षांपासून सुरु असून प्रत्यक्षात स्मारकाचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकासाठी शासनाने मागील दोन अर्थसंकल्पिय वर्षात अनुक्रमे शंभर-शंभर कोटींची आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी गेल्या वर्षभरापासून केवळ वेगवेगळया समित्या नेमण्यापलिकडे शासनस्तरावर अन्य कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी व माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच समित्यांची रचना, कार्यकक्षा व कालावधी काय आहे,

(५) उक्त स्मारकाचे काम प्रत्यक्षात केव्हा सुरु होऊन ते किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सन २०१४-१५ करिता रु.१००.०० कोटी व सन २०१५-१६ करिता रु.७०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करण्यासाठी योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे ३ वेळा निविदा प्रक्रीया रद्द करण्यात आल्या. चौथ्या वेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेद्वारा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करण्यात आली असून प्रकल्पाचे काम लवकर सुरु होईल.

(४) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी पुनर्गठीत करण्यात आलेल्या समित्या, त्यांची रचना व कार्यकक्षा याबाबतच्या माहितीचे परिशिष्ट "अ", "ब" व "क" पुढील प्रमाणे आहे :

**" परिशिष्ट-अ "**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९, दिनांक १९ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये पुनर्गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय सूकाणू समितीची रचना व कार्यकक्षा

| **अ.क्र.** | **समितीवरील सदस्य** | **समितीवरील पदनाम** | **समितीची कार्यकक्षा** |
|---|---|---|---|
| १ | मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष | (१) श्री.विनायकराव मेटे, विधानपरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीने शिफारस केलेल्या स्मारकाचा आराखडा, संकल्पना व अन्य शिफारशी विचारात घेणे व त्यास अंतिम मान्यता देणे.<br>(२) प्रकल्पाशी संबंधीत सर्व निविदांना अंतिम मान्यता देणे.<br>(३) स्मारकाबाबत ऐनवेळी उद्‌भवलेल्या विषयावर निर्णय घेणे.<br>(४) स्मारकाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार समितीला असतील. |
| २ | मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) | सदस्य | |
| ३ | मा.मंत्री (पर्यटन) | सदस्य | |
| ४ | मा.मंत्री (वित्त व नियोजन) | सदस्य | |
| ५ | मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) | सदस्य | |
| ६ | मा.पालकमंत्री, मुंबई शहर | सदस्य | |
| ७ | मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन) | सदस्य | |
| ८ | श्री.विनायकराव मेटे, विधानपरिषद सदस्य | सदस्य | |
| ९ | मुख्य सचिव | सदस्य | |
| १० | अप्पर मुख्य सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य | |
| ११ | अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग | सदस्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य | |
| १३ | अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य | |
| १४ | प्रधान सचिव (नवि-१), नगरविकास विभाग | सदस्य | |
| १५ | सचिव (नवि-२), नगर विकास विभाग | सदस्य | |
| १६ | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य | |
| १७ | मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड | सदस्य | |
| १८ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | |
| १९ | सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य सचिव | |

**"परिशिष्ट-ब"**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९, दिनांक १९ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये पुनर्गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीची रचना व कार्यकक्षा

| **अ.क्र.** | **समितीवरील सदस्य** | **समितीवरील पदनाम** | **समितीची कार्यकक्षा** |
|---|---|---|---|
| १ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग | अध्यक्ष | (१) सदर समिती प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीकरीता निविदा तयार करुन निविदा मागविणे, प्राप्त निविदांचे मूल्यांकन करुन प्रस्ताव मान्यतेसाठी प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीमार्फत उच्चस्तरीय **सुकाणू समितीस सादर करील.** |
| २ | सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य | |
| ३ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई | सदस्य | |

<table>
<tr><td>४</td><td>मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई</td><td>सदस्य</td><td rowspan="11">(२) प्रकल्प व्यवस्थान सल्लागार कंपनीच्या सहकार्याने सर्व प्रकारच्या कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने सादर केलेल्या प्रस्तावाची तांत्रिक छाननी करुन प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीमार्फत उच्चस्तरीय<br>सुकाणू समितीस शिफारस करणे.<br>(३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीमार्फत निविदा कागदपत्रे तयार करणे, निविदा मागविणे व प्राप्त निविदांची तांत्रिक छाननी करुन प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीमार्फत उच्चस्तरीय<br>सुकाणू समितीस उचित शिफारस करणे.<br>(४) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार तसेच स्मारकाच्या बांधकामासाठी नेमावयाच्या कंत्राटदाराबरोबर करावयाच्या करारपत्रांची तपासणी करुन अंतिम करणे.<br>(५) कामाच्या प्रगतीचा आढावा, गुणवत्ता व दर्जा तसेच पर्यवेक्षण यावर नियंत्रण ठेवणे.<br>(६) स्मारकाचे बांधकाम सुरु असताना काही तांत्रिक किंवा ऐतिहासिक पार्श्वभूमी अनुषंगाने काही बाबीमध्ये बदल करावयाचा झाल्यास तसा प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीमार्फत उच्चस्तरीय सुकाणू समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे.</td></tr>
<tr><td>५</td><td>अधिक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, कोकणभवन</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६</td><td>अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण विभाग, कोकणभवन</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>७</td><td>अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, कोकणभवन</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>८</td><td>उप मुख्य अभियंता (मेट्रो), मुंबई महानगरपालिका, मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>९</td><td>प्राचार्य, जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>१०</td><td>संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>११</td><td>संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>१२</td><td>वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई</td><td>सचिव</td></tr>
<tr><td>१३</td><td>अधिक्षक, अभियंता, मुंबई (सां.बा.) मंडळ, मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>१४</td><td>मुख्य अभियंता (सां.बा.), प्रादेशिक विभाग, मुंबई</td><td>सदस्य<br>सचिव</td></tr>
</table>

**" परिशिष्ट- क "**

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९, दिनांक १९ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये पुनर्गठीत करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीची रचना व कार्यकक्षा.**

| अ.क्र. | समितीवरील सदस्य | समितीवरील पदनाम | समितीची कार्यकक्षा |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री.विनायकराव मेटे, विधानपरिषद सदस्य | अध्यक्ष | (१) स्मारकाच्या बांधकामाचे नियोजन व त्याच्या अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या टप्प्यापासूनच विविध क्षेत्रातील उदा. आराखडा व संकल्पचित्र, सुरक्षा, वाहतूक, आपत्कालीन व्यवस्थापन, स्मारक उभारणी या बाबींवर देखरेख करणे व मार्गदर्शन करणे, व आवश्यकतेनुसार प्रस्ताव मंजूरीसाठी उच्चस्तरीय सुकाणू समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे.<br>(२) स्मारकाच्या उभारणीबाबत आवश्यक त्या परवानग्या घेणे व त्यांच्या अटींची पूर्तता करणे.<br>(३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामावर देखरेख व समन्वय ठेवणे.<br>(४) स्मारकाच्या उभारणीबाबत आवश्यक त्या विविध निविदा प्रक्रियेवर सनियंत्रण करणे, तसेच |
| २ | अपर मुख्य सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य | |
| ३ | अपर मुख्य सचिव (पर्यावरण) | सदस्य | |
| ४ | सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य | |
| ५ | सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | सदस्य | |
| ६ | सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | सदस्य | |
| ७ | सचिव (नवि-२), नगरविकास विभाग | सदस्य | |
| ८ | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य | |
| ९ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | सदस्य | |
| १० | आयुक्त, मुंबई प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) | सदस्य | |
| ११ | महाव्यवस्थापक, बेस्ट,मुंबई | सदस्य | |
| १२ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई | सदस्य | |
| १३ | व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य | |
| १४ | सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई | सदस्य | |
| १५ | संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | |
| १६ | संचालक, अग्निशमन दल, मुंबई | सदस्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | प्राचार्य, जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई | सदस्य | त्यांच्या अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव |
| १८ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | शिफारशींसह उच्चस्तरीय सुकाणू समितीस सादर |
| १९ | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई | सदस्य | करणे.<br>(५) स्मारकाच्या उभारणीत |
| २० | भारतीय नौदलाचे प्रतिनिधी | सदस्य | तांत्रिक किंवा ऐतिहासिक पार्श्वभूमी विषयक |
| २१ | तटरक्षक दलाचे प्रतिनिधी | सदस्य | आवश्यक असेल तर |
| २२ | मुख्य अभियंता, मुंबई (सां.बा.), प्रादेशिक विभाग, मुंबई | सदस्य सचिव | किरकोळ बदल व सुधारणा करणे.<br>(६) स्मारकाच्या सुरक्षेबद्दल व आपत्कालीन व्यवस्थेबाबत उच्चस्तरीय सुकाणू समितीला शिफारस करणे<br>(७) स्मारकाचे भूमिपूजन, उदघाटन व वेगवेगळया वेळी पुढील काळामध्ये विविध कार्यक्रमांच्या आयोजनांचे नियोजन व समन्वय करणे.<br>(८) स्मारकाची दैनंदिन देखभाल, दुरुस्ती व जतन करण्यासाठी पर्यटकांकडून वसूल करावयाच्या शुल्काबाबत अंतिम निर्णय घेणे.<br>(९) सदर समिती आवश्यकतेनुसार या प्रकल्पाच्या सुरु असलेल्या कामकाजाचा सर्वसाधारण आढावा घेईल.<br>(१०) समितीस आवश्यक वाटल्यास इतर विभागांचे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सचिव किंवा इतर अधिकारी व विविध क्षेत्रातील विशेषज्ञ यांना आमंत्रित करण्याचे व गरजेनुसार सल्लागार नियुक्ती करण्याचे अधिकार समितीला असतील.<br>(११) समितीच्या दैनंदिन कामकाजाकरिता स्वतंत्र कार्यालय असेल.<br>(१२) संचालक, पुराभिलेख, कला संचालनालय, सांस्कृतिक संचालनालय यांचेशी समन्वय साधून अस्त्र, शस्त्र, अवजारे, ग्रंथ, पुस्तके, रोजनिशी, छत्रपती शिवाजी महाराज व इतिहासाशी संबंधित बाबी इत्यादी संग्रहालय उभारण्यासाठी एकत्रित करणे. |

(५) व (६) स्मारकाचे काम चालू वर्षी सुरु होऊन साधारणत: ४० महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

-----------------

**गंगापूर (जि नाशिक) धरणाजवळील बोटक्लब कार्यान्वित करण्याबाबत**

**(९) * १४९४१ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलातील जागतिक दर्जाच्या बोटक्लबची इमारत गत दिड वर्षांपासून पूर्ण होवूनही सदर बोटक्लब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान कार्यान्वित करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटन संकुलातील कन्व्हेन्शन सेंटरसाठी निधी मंजूर असूनही सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याने सदर प्रकल्पाचे काम माहे जानेवारी, २०१६ पर्यंत पुर्ण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. मौजे गंगापूर धरण बोटक्लबचे बांधकाम पाटबंधारे विभाग, नाशिक यांच्यामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. सदर बोटक्लब व बोटीचा ताबा पाटबंधारे विभाग, नाशिक यांच्याकडून महामंडळाकडे घेण्यात आला आहे. सदर बोटक्लब व बोटी खाजगी संस्थेमार्फत चालविण्याकरीता संस्थेची नेमणूक झाल्यावर जलक्रिडा केंद्र त्वरीत सुरु करण्यात येणार आहे.

(२) मूळ प्रशासकीय मान्यता केंद्रीय पर्यटन मंत्रालयाची असल्याने राज्य शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कन्व्हेन्शन सेंटरसाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने ज्या बाबींसाठी निधी मंजूर केला आहे त्या व्यतिरिक्त उर्वरित बाबींसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महापालिकेच्या कै.अण्णासाहेब मगर रुग्णालयाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१०) * १५७४५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या कै.अण्णासाहेब मगर रुग्णालयाच्या इमारतीची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रुग्णालयामध्ये प्रसूतीसाठी आवश्यक असलेले साहित्य वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या नुतनीकरणासाठी प्रसूती विभाग सुमारे दोन वर्षापासून बंद असल्याने गरोदर महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना पुरेशी आरोग्य सेवा मिळावी व रुग्णालयाची दुरवस्था सुधारावी म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) कै. अण्णासाहेब मगर रुग्णालयातील प्रसुती विभाग सुमारे दोन वर्षांपासून बंद आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, या रुग्णालयात गरोदर मातांची नोंदणी, आरोग्य तपासणी, औषधोपचार इत्यादी बाबी सदर रुग्णालयात करण्यात येतात.

या रुग्णालयात तपासणीसाठी आलेल्या महिलांची गैरसोय होऊ नये म्हणून कै. अण्णासाहेब मगर प्रसूतीगृह येथे एक सुसज्ज रुग्णवाहिका कायमस्वरुपी ठेवण्यात आली असून, येथून जवळच असलेल्या पुणे महानगरपालिकेच्या कै. नामदेवराव शिवरकर प्रसुतीगृह येथे मोफत प्रसुतीची सेवा उपलब्ध केलेली आहे.
(३) रुग्णांना पुरेशी आरोग्य सेवा-बाह्यरुग्ण विभाग, प्रयोगशाळा, लसीकरण, क्षयरोग तपासणी उपचार, कुटूंब नियोजन इत्यादी सेवा कार्यरत आहेत व रुग्णालयाची दुरुस्तीची कामे करण्यात आली असून, काही कामे बाकी आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर गुन्हयात वाढ झाल्याबाबत

**(११) * १६२६० श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, ठाणे, औरंगाबाद, पुणे व नागपूर हे पाच जिल्हे सायबर क्राईम मध्ये टॉप फाईव्ह म्हणून समोर आलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार सायबर गुन्हे वाढले असून सन २०१४ मध्ये ५११ गुन्हयांवरुन हे प्रमाण सन २०१५ मध्ये १ हजार ३६ गुन्हयांवर गेले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वाढत्या सायबर गुन्हयांना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तज्ञ व्यक्तींच्या पोलीस खात्यात नेमणूका करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
(२) सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे.
(३) सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत.

१. दिनांक ५.१.२०१६ रोजी शासनाने विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर व महिला अत्याचार प्रतिबंध) यांचे नियंत्रणाखाली स्वतंत्र कक्षाची स्थापना केली आहे.
२. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी आयुक्तालये तसेच, पोलीस घटकामध्ये सायबर लॅब स्थापन करण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु आहे.
३. न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा, कलीना मुंबई मार्फत पोलीस अधिकारी व अंमलदारांना सायबर प्रशिक्षण देण्यात येत आहे.
४. महाराष्ट्र पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्ह्यांबाबत तपासाचे प्रशिक्षण देण्यात येते.

(४) सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व सायबर गुन्ह्यांच्या अन्वेषणासाठी तज्ञ व्यक्तींची मदत घेण्यात येते. तज्ञ व्यक्तींची आवश्यकता भासल्यास करार पध्दतीने त्यांची सेवा घेण्याबाबत विचार वेळोवेळी करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई ट्रान्स हार्बर रोड प्रकल्पाबाबत

**(१२) * १५६३८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी (मुंबई) ते चिर्ले (जि.रायगड) ला जोडणाऱ्या २२ किलोमीटर लांबीच्या मुंबई ट्रान्स हार्बर रोड जोड प्रकल्पाला मंजुरी देण्याचा निर्णय केंद्रीय पर्यावरण खात्याच्या तज्ञ मुल्यांकन समितीने पुढे ढकलला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान राष्ट्रीय हरित लवादाने यापुर्वीचा पर्यावरण खात्याचा आदेश नामंजूर करुन नवीन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी राष्ट्रीय हरित लवादाच्या पश्चिम विभागीय खंडपीठाने १५ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशान्वये सदर प्रकल्पास मिळालेल्या कोस्टल रेग्युलेशन झोन मंजूरीला सहा महिन्यांकरीता स्थगिती दिली असून केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागास प्रकल्पास दिलेल्या कोस्टल रेग्युलेशन झोन मंजूरीचे पुनर्विलोकन करण्याचे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीमार्फत केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्रीय पर्यावरण विभागाने दि. २५ जानेवारी, २०१६ रोजी प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन मंजूरी प्रदान केली आहे. सदर प्रकल्पाकरीता सल्लागार नेमण्याकरीता निविदा प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरू करण्यात आली असून सदर प्रकल्पाकरीता कंत्राटदार नेमण्याकरीता निविदा प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे काम माहे डिसेंबर, २०१६ मध्ये सुरू करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

-----------------

## पुणे महापालिकेत कालमर्यादा संपुष्टात आलेले अग्निरोधक बसविण्यात आल्याबाबत

**(१३) * १५०८९ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये आपातकालीन व्यवस्थेत महानगरपालिकेचे संरक्षण होण्याकरिता लाखो रुपये खर्च करुन सन २०१३ मध्ये अग्निरोधक बसविण्यात आलेले असून त्यांचा वापर कालावधी संपुष्टात आला असताना व त्यांचा काहीही उपयोग नसताना ते बसविलेले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे कर्मचाऱ्यांना, येणाऱ्या नागरिकांना आपातकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने अग्निरोधक वेळेत बदल न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये रुपये ५.५६ लक्ष खर्च करुन अग्निरोधक बसविण्याचे काम पूर्ण केले असून, त्या सिलेंडरचा रिफिलिंगचा कालावधी सप्टेंबर, २०१३ पर्यंत होता. सदर अग्निरोधकांचे रिफिलिंग करुन घेण्यात आलेले आहे.

दरम्यानच्या कालावधीत संपूर्ण इमारतीमध्ये अद्ययावत स्वयंचलित अग्निशामक यंत्रणा उभारण्यासाठी पुढीलप्रमाणे कामे जून, २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत.:-

१) सर्व ठिकाणी अग्निरोधक बसविणे.
२) वेट रायझर लाईन, कोटयार्ड लाईन टाकणे, बुस्टर पंप बसविणे,
३) स्मोक डिटेक्टर, स्प्रिंक्लर सिस्टिम बसविणे, ओव्हर हेड टँक व फायर आलार्म बसविणे इत्यादी कामे.

(२) पुणे महानगरपालिकेमार्फत अद्ययावत फायर फायटिंग सिस्टीमची वरीलप्रमाणे कामे करण्यात आलेली असून, आपातकालीन परिस्थितीत सदर यंत्रणा कार्यान्वित होवून धोका टाळण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महापालिका हद्दीत काही भागात पाण्याची चोरी होत असल्याबाबत**

**(१४) * १५७६२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महापालिका हद्दीत काही भागात पाण्याची चोरी होत आहे तर काही भागात पाण्यासाठी नागरिकांना त्रास होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून येथील पाणी चोरी थांबवून नागरिकांना पुरेसे पाणी पुरविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये काही ठिकाणी अनधिकृत नळ जोडण्या असल्याचे नागरिकांकडून प्राप्त तक्रारीवरुन निदर्शनास आले आहे.

(२) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४०,१४४ अधिकृत नळ जोडण्या आहेत. महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनधिकृत नळ जोडण्या शोध मोहिम नोव्हेंबर, २०१५ पासुन सुरु केली. यामध्ये आतापर्यंत ३५२ नळ जोडण्या अनधिकृत असल्याचे निर्देशनास आले आहे. या सर्व नळजोडण्या खंडीत करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत अनधिकृत नळ जोडण्या शोधण्याबाबत सर्वेक्षण प्रगती पथावर असून जुन, २०१६ पर्यंत सर्वेक्षण पुर्ण करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. तसेच अशा प्रकारच्या अनधिकृत नळ जोडण्या आढळल्यास त्या त्वरीत खंडीत करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच महानगरपालिका क्षेत्रात २२२ द.ल.लि.पाण्याची गरज असताना १३० द.ल.लि.प्रतिदिन पाणीपुरवठा उपलब्ध असल्याने एक दिवस आड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत सुर्या टप्पा ३ मध्ये वाढीव १०० द.ल.लि. प्रतिदिन योजनेचे काम प्रगतीपथावर असून सदरची योजना पुर्ण झाल्यानंतर दररोज पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**युसुफवाडगाव (ता.केज, जि.बीड) येथील पोलीस ठाण्याचे**
**पोलीस निरीक्षकास लाच घेतना अटक केल्याबाबत**

**(१५) * १६१५१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युसुफवडगाव (ता.केज, जि.बीड) येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.आनंद निगंदळे यांनी ढाकेफळ येथील पारधी समाजाच्या महिलेला रुपये ७५ हजारांची लाच अटक टाळण्याकरिता मागितली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही लाच अटक टाळण्याकरिता व गुन्ह्याची कलमे कमी करण्याकरिता मागण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अधिका-याला लाचलुचपत प्रतिबंधक अधिका-याने रंगेहात पकडूनही योग्य कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) तक्रारदार श्रीमती राजुबाई काळे यांचा पती व इतर नातेवाईक यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे युसुफवडगाव येथे दाखल गुन्ह्यात आरोपींना जामीन मिळण्यासाठी मदत करण्याकरिता रुपये ७५,०००/- ची मागणी करुन त्यापैकी रुपये ५०,०००/- इतकी रक्कम यापूर्वीच स्वीकारली आहे. तसेच आरोंपीच्या जामीनासाठी केलेली मदत व त्यांच्यावर दुसरा गुन्हा दाखल न करण्यासाठी रुपये २५,०००/- ची मागणी केलेबाबत दिनांक १२.०१.२०१६ रोजी तक्रार दिली आहे.

(३), (४) व (५) सहायक पोलीस निरीक्षक आनंद निंगदळे यांनी तक्रारदार यांचेकडे आरोपींच्या जामीनासाठी केलेली मदत व त्यांच्यावर दुसरा गुन्हा दाखल न करण्यासाठी रुपये २५,०००/- ची मागणी करुन तडजोडीअंती रुपये २०,०००/- लाच स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन युसुफवडगाव येथे गु.र.क्र.९/२०१६, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दिनांक १४.१.२०१६ रोजी अटक करण्यात आली होती त्याला मा.विशेष न्यायालय, अंबाजोगाई यांनी त्याच दिवशी जामीन मंजूर केला आहे. आरोपी श्री.आनंद निंगदळे, सहायक पोलीस निरीक्षक यांस दिनांक १४.१.२०१६ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## महाराष्ट्रातील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१६) * १६२०३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासन स्तरावर केव्हापर्यंत अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नगरसेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्यांना मानधन दिले जात नाही. परंतु त्यांना प्रवासभत्ता दिला जातो. त्यामुळे जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्यांना मानधन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील बालमाता रुग्णालय बंद असल्याबाबत

**(१७) * १४७१० श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.आनंद ठाकूर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील सेक्टर २३ मध्ये असलेले बालमाता रुग्णालय पुनर्बांधणीच्या कामासाठी ३ महिन्यांपासून बंद ठेवण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गरीब रुग्णांचे हाल होत असल्याने त्यांना पर्यायी वैद्यकीय सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माता बाल रुग्णालय, कोपरखैरणे या रुग्णालयाच्या इमारतीची नवी मुंबई महानगरपालिकेकडून संरचनात्मक तपासणी (structural audit) करण्यात आली असून या तपासणीअंती सदर इमारत धोकादायक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या रुग्णालयाची इमारत पाडून त्याठिकाणी नवीन इमारत बांधण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. परिणामी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून सदर रुग्णालय सद्यस्थितीत बंद ठेवण्यात आले आहे.

(२) हे रुग्णालय बंद असल्याच्या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होवू नये, याकरीता पर्यायी व्यवस्था म्हणून महानगरपालिकेकडून सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली येथे वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत**

**(१८) * १४९८६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकित असलेली सुमारे रक्कम रुपये १२५ कोटींची देणी मिळावीत तसेच न्यायालयाचे आदेशानुसार अजूनही ६१५ कर्मचाऱ्यांना परिवहन सेवेत सामावून घेणे यासह विविध दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी ठाणे परिवहन सेवेच्या कर्मचाऱ्यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी काम बंद आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेबाबत महापालिका प्रशासनाचे आश्वासनानुसार कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेऊन ६ महिने इतका कालावधी होऊन देखील त्यांच्या मागण्यांची अद्याप पूर्तता झाली नसल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांच्या मागण्यांसंदर्भात महापालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने पुन्हा दिनांक २६ जानेवारी, २०१६ प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी आंदोलन करण्याचे लेखी निवेदन ठाणे परिवहन सेवा कर्मचाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यपाल, मा.महापौर व आयुक्त, ठाणे महापालिका यांना दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांच्या थकित देणी व अन्य मागण्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

परिवहन सेवेतील कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची रुपये ३१.२६ कोटी एवढी रक्कम विविध भत्यांपोटी प्रलंबित आहे.

तसेच परिवहन सेवेतील ६१३ कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणेबाबत मा.उच्च न्यायालयातील लेटर पेटंट अपील क्र. २१९/२००५ च्या अंतिम निर्णयानुसार ज्या तारखेपासून पदांना मंजूरी दिली त्या तारखेपासून सेवेत कायम करण्यात यावे असे उभयपक्षी मा.उच्च न्यायालयात निश्चित करण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक ३१.०८.२००९ पासून चालक १९७ व वाहक ३४१ अशा एकूण ५३८ पदांना मंजूरी दिली. त्यानुसार त्यांना कायमस्वरुपी सेवेचे लाभ लागू करण्यात आले आहेत. मात्र मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ज्या तारखेपासून कायम स्वरुपी सेवेचे लाभ लागू झाले त्या तारखे संदर्भात कर्मचाऱ्यांमध्ये एकमत नसल्याने निर्णयाची अंमलबजावणी अंशत: झाली आहे.

कर्मचाऱ्यांनी १५ ऑगस्ट, २०१५ रोजी काम बंद आंदोलन केले होते. तथापि, तत्कालिन परिवहन व्यवस्थापकांच्या लेखी आश्वासनानुसार सदरचे आंदोलन मागे घेण्यात आले होते.

(२) ठाणे महानगरपालिकेकडून माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित देण्यापोटी रुपये ४.९६ कोटी अनुदान प्राप्त झाले होते. त्यानुसार सदरील रक्कम महागाई भत्ता फरक व इतर देण्यापोटी परिवहन सेवा कर्मचाऱ्यांना दिनांक ३०.०९.२०१५ रोजी वाटप करण्यात आलेली आहे.

(३) होय.

कामगारांच्या मागण्यासंदर्भात महापालिकेकडे दिनांक २६.१.२०१६ रोजी आंदोलन करण्याचे कर्मचारी संघटनेने लेखी निवेदन दिले होते.

(४) परिवहन सेवेकडील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित देण्यापोटी सन २०१६-१७ च्या परिवहन सेवेच्या अंदाजपत्रकात ठाणे महानगरपालिकेकडे अनुदानापोटी रक्कम रुपये ३० कोटीची मागणी करण्यात आलेली आहे. सदर अंदाज पत्रक ठाणे महानगरपालिकेच्या महासभेपुढे सादर केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहराला कंत्राटदाराकडून दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(१९) * १५२११ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेंतर्गत शहराला शुध्द पाणी पुरवठा करण्याचे कंत्राट खाजगी कंपनीला देण्यात येवूनही सदर कंत्राटदाराकडून शहरात दुषित पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळ योजनेचे दिडशे व्हॉल्व्ह मधून पाणी गळती होत असल्याने हजारे लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १३ जानेवारी, २०१६ अथवा त्यादरम्यान अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

चंद्रपूर शहराला होणारा पाणीपुरवठा हा पिण्यायोग्य राहण्याच्या दृष्टीने या पाण्याचे दरमहा १०० ते ११० नमुने घेवून त्याची जिल्हा प्रयोगशाळेत तपासणी केली जाते.

मागील ११ महिन्यातील पाणी नमुने तपासणी अहवाल पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले असून मार्च, २०१६ चा अहवाल अप्राप्त आहे.

(२) शहरात सुमारे २६७ व्हॉल्व असून, यामधून गळती निदर्शनास आल्यास ती वेळीच दुरुस्त करण्यात येते व नियमित देखभाल दुरुस्ती करण्यात येत असते. त्यामुळे हे खरे नाही.

(३) चंद्रपूर शहर नळ पाणीपुरवठा योजना खाजगी कंत्राटदारामार्फत चालविण्यात येत असून, त्यावर महानगरपालिकेद्वारा सतत देखरेख ठेवली जाते. असे आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

उक्त वस्तुस्थिती पहाता, कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणात महापालिकेकडून वेळोवेळी देखरेख ठेवण्यात येत असल्याने, विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई फर्स्ट या संस्थेचा एमएमआर कन्सेप्ट प्लॅन प्रलंबित असल्याबाबत

**(२०) * १४७६८ आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार येथील पायाभूत सुविधा संदर्भातील आढावा घेण्याची संकल्पना मांडणारा मुंबई फर्स्ट या संस्थेचा एमएमआर कन्सेप्ट प्लॅन हा मा.मुख्यमंत्री यांना सादर केलेला असतानाही ४ वर्ष प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालातील शिफारशीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांनी सन २०११ मध्ये मुंबई महानगर प्रदेशासाठी पुढील ४० वर्षाकरिता कन्सेप्ट प्लॅन चे प्रारुप तयार करुन त्याबाबतचे सादरीकरण मुख्य सचिव व इतर अधिका-यांसमोर माहे जानेवारी, २०१३ मध्ये केले आहे. मुंबई महानगर प्रदेशासाठीच्या मेट्रोपॉलिटन प्लॅनिंग कमिटीच्या मंजुरीनंतर सदर कन्सेप्ट प्लॅन मधील अभ्यासपुर्ण बाबींचा समावेश प्रारुप सुधारित प्रादेशिक योजनेमध्ये करण्याचे अभिप्रेत आहे. सदर प्रारुप प्रादेशिक योजनेस महानगर नियोजन समितीची मान्यता व शिफारस प्राप्त होऊन तसा प्रस्ताव शासनास सादर झाल्यानंतर उचित निर्णय घेण्यात येईल.

-----------------

**राज्यात पोलीस कोठडीत आरोपींचा मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२१) * १५९१५ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीस कोठडीत आरोपींचा मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असून या घटना रोखण्यास अपयशी ठरलेल्या शासनावर मा.मुंबई उच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस ठाण्यामध्ये सीसीटीव्ही बसवण्याबाबत दिलेल्या आदेशाचे शासनाने पालन न केल्याबाबत मा.न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस कोठडीत आरोपींचा मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मा.उच्च न्यायालयाने क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ मध्ये पोलीस कोठडीतील मृत्यूचे प्रमाण विविध उपाययोजनाद्वारे कमी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे ही एक आहे.

(३) राज्यातील पोलीस स्टेशन मध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणेची कार्यवाही सुरु असून पोलीस कोठडीतील मृत्यू टाळण्याकरीता करावयाच्या उपाययोजना यांचा अभ्यास करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती गठीत केलेली आहे. पोलीस कोठडीतील मृत्यूचा सातत्याने आढावा घेण्यात येत असून ते रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील उड्डाणपुलांच्या निविदा प्रक्रियेबाबत

**(२२) * १४६७२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील युनिव्हर्सल चौक ते वारजे उड्डाण पुलापर्यंत (हायवे) आणि कमिन्स कॉलेज चौकातील साई मंदिर ते काकडे सिटीच्या पुढेपर्यंत असलेल्या दोन उड्डाण पुलांच्या कामाकरिता महापालिकेने एकाच निविदा प्रक्रियेमध्ये मान्यता दिल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उड्डाणपुलापैकी युनिव्हर्सल चौकाच्या पुलाला जागेचा ताबा मिळत नसल्याने तो रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेच्या या गलथान कारभाराविषयी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कमिन्स कॉलेज चौक येथे व युनिव्हर्सल चौक येथे उड्डाणपूल बांधणे या दोन्ही कामांचा एकाच निविदेमध्ये समावेश आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) नाही.

तथापि, विकास आराखड्यातील रस्तारुंदीने बाधित मिळकतींचा ताबा न झाल्याने युनिव्हर्सल चौकातील उड्डाणपुलाचे काम निविदेतून रद्द करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयातील औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील विदयार्थ्यांकडून प्रवेश शुल्क आकारण्यात आल्याबाबत**

**(२३) * १५०५४ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील विदयार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी रुपये १०००/- शुल्क आकारण्यात आले असल्याचे निदर्शनास आले असून राज्यात दुष्काळ असल्याने कोणतेही शुल्क आकारु नये असे शासनाचे धोरण असतांनाही शुल्काची आकारणी करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील विदयार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी शुल्क आकारण्यात येऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) राज्यातील शासकीय/अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश प्रक्रीयेच्यावेळी प्रशिक्षणार्थीकडून रूपये १०००/- संस्था विकास शुल्क आकारण्यात आले होते. तथापि, यासंदर्भात शासनाने सदर शुल्क परत करण्याचे आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील गुंतवणूकदारांची बनावट कंपनी उघडून फसवणूक केल्याबाबत

**(२४) * १४९०७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (ता.महाड, जि.रायगड) ऑक्सर मॅनेजमेंट सर्व्हिसेस कंपनीने शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक करुन गुंतवणूकदारांना सुमारे ३ ते ४ कोटी रुपयांना फसविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड शहरातील ट्रेड सेंटर या इमारतीमध्ये गेल्या ३ वर्षापासून हि वित्त कंपनी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या वित्त कंपनीचे मुख्य कार्यालय ओरिसा येथे असून कंपनी मालक व सर्व संचालक हे ओरिसा येथील रहिवासी आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

बिरवाडी ता. महाड व गोरेगांव ता. माणगाव (जि. रायगड) येथील गुंतवणूकदारांची ऑक्सर मॅनेजमेंट सर्व्हिसेस या कंपनीमार्फत ३,६७,३२,२७०/- रुपयांची फसवणूक केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर कंपनी विरुध्द महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ३४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेकोली (नागपूर) येथील पद भरती गैरव्यवहाराबाबत

**(२५) * १५६२८ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेकोली (नागपूर) येथील निवृत्तीला आलेल्या कर्मचाऱ्यांनी स्वत: ला अनफिट दाखवून आपल्या जागेवर नातेवाईकांची नियुक्ती केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे मागील काही वर्षात ६०० पेक्षा जास्त जणांनी आपली वर्णी वेकोलीमध्ये लावली असून निवृत्तीला काही वर्ष शिल्लक असतांना प्रकृती अस्वस्थ असल्याचे कारणे सांगायची व याकरिता दर महिन्याला वेगवेगळे प्रमाणपत्र गोळा करायचे सातत्याने काहीतरी कारण दाखवून काम होत नसल्याचे वरिष्ठांच्या नजरेस आणून देऊन आपल्या नातेवाईकांची अशाप्रकारे भरती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पद भरती गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही, तथापि, नॅशनल कोल वेजेस ॲग्रीमेंट मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे नाही. केवळ नॅशनल कोल वेजेस ॲग्रीमेंटचा स्तंभ ९.४.०. नुसार गठीत मेडीकल बोर्डाने कर्मचारी अपात्र आहे अशी शिफारस केल्यावरच तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

(३) वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेड (नागपूर) केंद्र शासनाचा उपक्रम असून या प्रकरणात चौकशी करण्याचे अधिकार राज्य शासनाला राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील रेवंडी जंगलमय भागात**
**ग्रामसेवकाचा मृतदेह आढळल्याबाबत**

**(२६) * १५८५८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील रेवंडी जंगलमय भागात दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास ग्रामसेवक सुनिल पावरा यांचा मृतदेह गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी जंगलात पुरुष जातीचे प्रेत गळफास लावलेल्या स्थितीत आढळून आल्याच्या मिळालेल्या खबरीवरुन मालवण पोलीस ठाणे येथे आकस्मित मृत्यू, रजि.नंबर ५९/२०१५ क्रि.प्रो.को.कलम १७४ प्रमाणे दाखल केले आहे. मयताची ओळख पटविली असता मयत हा श्री.सुनिल ठोबा पावरा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, मालवण यांनी मयताचे मरणाबाबत संशय व्यक्त केल्याने मालवण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.८५/२०१५, भा.दं.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भ, मराठवाड्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत**

**(२७) * १५७३७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भ, मराठवाडा विभागातील शाळा, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे दुष्काळामुळे परिक्षा शुल्क माफ करण्यात आले आहे, मात्र औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, यवतमाळ जिल्ह्यासह मराठवाड्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सद्य:स्थितीत यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

-----------------

## राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापण्याबाबत

**(२८) * १६२९८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२२२४ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांवर विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालयाने सादर केलेल्या अभिप्रायावर वित्त विभागाने पुन्हा जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या अनुषंगाने दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही.

(२) होय, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालयाचे अभिप्राय दि.१८/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाले असून नमूद मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रस्ताव वित्त विभागाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर केला आहे.

(३) शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तारकर्ली खाडी पात्रातील उपसा केलेला गाळ खाडीपात्रातच वाहून गेल्याबाबत

**(२९) * १८०३७ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तारकर्ली खाडी पात्रातील गाळ उपशाचे काम बंदर विभागाकडून सन २०१३ पासून सुरु असून उपसा केलेल्या गाळाचे योग्य नियोजन न केल्यामुळे उपसा करुन ठेवलेला गाळ पुन्हा खाडीपात्रातच वाहून गेल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंदर विभागामार्फत तारकर्ली खाडी पात्रातून उपसा केलेला गाळ योग्य ठिकाणी टाकण्याबाबत तारकर्ली ग्रामपंचायतीने बंदर विभाग, मालवण यांचेकडे वारंवार निवेदने देवूनही त्याकडे सदर विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे उपसा केलेला गाळ पुन्हा खाडीपात्रात वाहून गेल्याने शासनाने खर्च केलेली लाखो रुपयांची रक्कम वाया गेलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) व (३) नाही.

माहे ऑक्टोबर, २०१५ ते जानेवारी, २०१६ पर्यंत ३४,४४७ घनमीटर एवढा गाळ काढण्यात आलेला आाहे. तारकर्ली खाडीमध्ये गाळ उपसणी केल्यामुळे बोटींग करण्यासाठी आणि मासेमारी नौका यांना मार्गक्रमण करण्यासाठी सुलभ झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगोली जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामसेवकाकडून लाच घेतल्याबाबत**

**(३०) * १६६९८ श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायतीच्या दफ्तर तपासणीत त्रुटी काढून कार्यवाहीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात येऊ नये याकरिता हिंगोली जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग) श्री.विलास जाधव आणि ग्रामविकास अधिकारी श्री.महेश थोरकर यांनी ग्रामसेवक श्री.दत्ता क्रेदे यांचेकडून १० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने संबंधित दोषी लाचखोर अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्‌नुसार त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) तक्रारदार श्री.दत्ता निवृत्ती क्रेदे, ग्रामसेवक यांचे ग्रामपंचायत उमरा येथील कार्यालयीन दप्तर तपासणी करताना त्रुटी न काढण्यासाठी तसेच कसूरी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडे न पाठविण्यासाठी लोकसेवक श्री.विलास पोपट जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी श्री.महेश मधूकरराव थोरकर, ग्रामविकास अधिकारी यांच्या मार्फत दिनांक ५.२.२०१६ रोजी लाचेची रक्कम रुपये १०,०००/- तक्रारदार यांचेकडून स्वीकारली आहे.

या संदर्भात श्री.विलास पोपट जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.महेश मधूकरराव थोरकर, ग्रामविकास अधिकारी यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन हिंगोली येथे गु.र.क्र.३०/२०१६, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने दोन्ही आरोपींना दिनांक ६.२.२०१६ रोजी अटक करुन मा.न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने त्यांची दिनांक ८.२.२०१६ रोजी जामीनावर मुक्तता केली आहे.

आरोपी लोकसेवक श्री.महेश मधूकरराव थोरकर, ग्रामविकास अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद हिंगोली यांच्या दिनांक २४.२.२०१६ च्या आदेशान्वये दिनांक ५.२.२०१६ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबत

**(३१) * १६८५१ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांना मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी महापालिकेकडे निधी उपलबध नसल्याने २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करावी अशी मागणी सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने शासनाकडे केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कल्याण-डोंबिवलीतील २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून २७ गावे वगळून या गावांच्या क्षेत्राकरीता नगरपरिषद घटीत करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या प्राथमिक अधिसूचनेच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या हरकती व सूचनांस अनुसरुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सूचित करण्यात आले आहे.

-----------------

**राज्यात तसेच मुंबई शहरात होणाऱ्या बेकायदा शस्त्रांच्या वापरास व तस्करीस अटकाव करण्याबाबत**

**(३२) * १६८५७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात बेकायदा शस्त्रांचा वापर तसेच शस्त्रांची तस्करी होत असल्याची माहिती गुन्हेगारीच्या आकडेवारी वरुन माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वाढत्या बेकायदा शस्त्रांना अटकाव करण्यासाठी तसेच तस्करी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहरात बेकायदा शस्त्रांची तस्करी बाबत गुन्हा दाखल नाही. तथापि, राज्यामध्ये बेकायदा शस्त्रांच्या तस्करीचे जानेवारी, २०१५ मध्ये तीन गुन्हे डिसेंबर, २०१५ मध्ये एक गुन्हा तसेच जानेवारी, २०१६ मध्ये अकरा गुन्हे दाखल आहेत.

बेकायदा अग्निशस्त्र बाळगल्याबाबत मुंबई शहरांमध्ये सन २०१४ मध्ये २३२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३२२ आरोपींना अटक करून २७१ अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली. तसेच २०१५ मध्ये १४४ गुन्हे दाखल असून त्यामध्ये २५० आरोपींना अटक करून १७७ अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली. जानेवारी-फेब्रुवारी, २०१६ मध्ये १८ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३४ आरोपींना अटक करून २० अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे मुंबई शहर वगळून राज्यामध्ये सन २०१५ मध्ये ४७५ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ८७८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच जानेवारी, २०१६ मध्ये ३९ गुन्हे दाखल असून या गुन्ह्यामध्ये ८३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) बेकायदा शस्त्रांना अटकाव करण्यासाठी तसेच तस्करी रोखण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्यातील अधिकारी/अंमलदार त्यांचे ठाणे हद्दीत परिणामकारक गस्त करत असतात. तसेच नाकाबंदी व कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येते. अवैध शस्त्रास्त्रे व त्यांच्या तस्करीबाबत गोपनिय माहिती गोळा करून संबंधित इसमांवर धाड टाकून कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे मान्यताप्राप्त परवानाधारक वितरक व दुकानदार यांचे शस्त्रसाठा रेकॉर्ड व विक्रीचे व्यवहार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून नियमित व अचानक तपासणी करून नियमबाह्य व्यवहार आढळून आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा यांना बेकायदा फलक निष्काषित करण्याचा आदेश मा.उच्च न्यायालयाने दिल्याबाबत**

**(३३) * १६८८५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा यांना शहरात लावण्यात आलेल्या सर्व बेकायदा होर्डिग (जाहिराती फलक) निष्काषित करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने मुंबई फलक मुक्त करण्याचे आदेश दिले असतानाही मुंबई महानगरपालिकेने फलकबाजी करीत स्वच्छतेबाबत प्रबोधन करीत असल्याचा आभास निर्माण करण्याचे प्रयत्न चालविले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जाहिरात फलकांबाबत महानगरपालिकेच्या मार्गदर्शक धोरणाच्या विपरित लावण्यात आलेल्या बेकायदा जाहिरात फलकांवर कारवाई करण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेने जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान मुंबई स्वच्छता प्रबोधनासाठी, जाहिरात फलकांचे मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणारी कोणतीही परवानगी अथवा अनुज्ञापन दिलेले नाहीत किंवा असे जाहिरात फलक लावले नाहीत.

स्वच्छता अभियानाअंतर्गत सद्यस्थितीत लावलेल्या जाहिरात फलकांना जाहिरात फलक नियमावलीनुसार (norms) व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशातील अटी व शर्तीनुसार परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) राज्यातील महानगरपालिकांकडून अनधिकृतपणे लागणाऱ्या कापडी फलकांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत शासनस्तरावरुन सर्व संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**संगमनेर नगरपरिषदेला भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३४) * १७११६ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) नगरपरिषद हद्दीतील भूसंपादनासाठी अनेक कामे निधी अभावी रखडली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नगरपरिषदेला भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत संगमनेर शहरातील काही आरक्षणांचे भुसंपादनासाठी रु.६० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला होता. तथापि दरम्यानच्या कालावधीत न्यायालयाच्या आदेशाने आरक्षण व्यपगत झाल्याने संगमनेर नगरपरिषदेस भुसंपादन करणे शक्य झालेले नाही.

----------------

## मुंबई शहर व उपनगरातील पाणी गळती रोखण्याबाबत

**(३५) * १७२१२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने दुष्काळी परिस्थिती असताना मुंबई शहर व उपनगरात गंजलेल्या तसेच नादुरुस्त जलवाहिन्यांमुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असून या जलवाहिन्यांच्या दुरुस्तीकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गंजलेल्या तसेच नादुरुस्त जलवाहिन्यांची दुरुस्ती करून पाणी गळती रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील जुन्या असलेल्या जलवाहिन्यांची दुरुस्ती करून पाणी गळती रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- सन २०११ ते २०१५ पर्यंत महापालिकेमार्फत एकूण १४६.०८ कि.मी. लांबीच्या जुन्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत.
- ७१.४१ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांच्या अंतर्गत भागावर रेती मिश्रित सिमेंटचा थर देऊन पुनर्वसन करण्यात आले आहे.
- महापालिकेच्या हद्दीत पाणी गळती निदर्शनास आल्यास, महापालिकेमार्फत गळती दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्यात येतात.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १८ विभागांत सन २०१३ पासून गळती अन्वेषण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
- उर्वरित विभागात लवकरच गळती अन्वेषण कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे.
- गळती अन्वेषण कक्षासाठी आवश्यक असणारी पदांची निर्मिती करून पदे भरण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत सुरु आहे.
- महापालिकेच्या २४ विभागात गळती शोधण्याचे काम अविरतपणे सुरु आहे.

- जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ पर्यंत संपूर्ण मुंबईमध्ये एकूण ३९,९५६ गळत्या शोधुन दुरुस्त करण्यात आल्या आहेत.
- मुंबई जलवितरण व सुधारणा प्रकल्प विभागातर्फे सेवा पुरवठादाराकडून हेलियम गॅस वापरुन गळती शोधण्याची कामे सुरु आहेत.
- सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सेवा पुरवठादारामार्फत सुचविलेल्या पध्दतीनुसार गळती अन्वेषणाची कामे करण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाने जाहीर केलेल्या स्मार्ट सिटी यादीतून मुंबई शहराला वगळल्याबाबत**

**(३६) * १७३८४ श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या पहिल्या स्मार्ट सिटी यादीत राज्यातील सोलापूर आणि पुणे शहराचा समावेश करण्यात आला आहे मात्र मुंबई शहराला वगळले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर हे राज्याची राजधानी असल्याने स्मार्ट सिटीच्या पहिल्या यादीत समावेश व्हावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये स्पर्धात्मक प्रक्रियेमधून संपूर्ण देशामधून पुढील ५ वर्षात एकूण १०० शहरांची निवड करण्याचे प्रस्तावित आहे. तद्‌नुषंगाने प्रथम टप्प्यात देशातील गुणानुक्रमे प्रथम २० शहरांची निवड करण्यात आली असून यामध्ये पुणे शहराची क्रमांक २ व सोलापूर शहराची क्रमांक ९ या गुणानुक्रमांकावर निवड झाली आहे.

गुणानुक्रमांकाच्या तालिकेत मुंबई शहराचा ४३ वा क्रमांक आहे.

स्पर्धेच्या पुढील टप्प्यात उर्वरित ८० शहरांना गुणात्मक दर्जा सुधारुन स्मार्ट सिटी म्हणून निवड होण्याची संधी प्राप्त होणार आहे.

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत स्वनिधीतून मुंबईकरीता निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------------------

**मुंबई शहरात कांजण्या आजाराचे रुग्ण आढळून आल्याबाबत**

**(३७) * १७८०२ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कांजण्या आजाराचे ७८ रुग्ण आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती प्रतिबंधक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संसर्गजन्य रोगांसाठी असलेल्या कस्तुरबा रुग्णालयामध्ये माहे जानेवारी, २०१६ मध्ये कांजण्या आजाराचे एकूण ३३४ रुग्ण दाखल झाले होते.

(२) कांजण्या आजारावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात :-

- कांजण्या हा विषाणुमुळे होणारा संसर्गजन्य रोग असल्यामुळे रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयात दाखल करून स्वतंत्र कक्षात (Isolation ward) ठेवण्यात येते.
- एखाद्या ठिकाणी कांजण्यांचा केंद्रीय उद्रेक (Focal Outbreak) आढळल्यास आरोग्य केंद्राद्वारे जनजागृती, विलनीकरण इ. करण्यात येते.
- सदर रुग्णांवर यथोचित (Symptomatic Treatment) उपचार करण्यात येतात.
- अति गंभीर रुग्णांना इंजेक्शन ॲसिक्लोव्हीर आणि ॲण्टीबायोटिक्स (Injection Acyclovir & Antibiotics) देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेळघाट (जि.अमरावती) येथे लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलींची खरेदी-विक्री करणारी टोळी जेरबंद केल्याच्या घटनेबाबत**

**(३८) * १७८३१ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलींची खरेदी-विक्री करणारी टोळी तंटा मुक्ती समिती व आदिवासी संघटनेच्या युवकांनी निदर्शनास आणून देऊन ती टोळी जेरबंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या पालकांना रुपये ५० हजार ते एक लाखाचे आमिष दाखवून आणि मुलींना परप्रांतात नेऊन लग्न लावून देण्याचे आश्वासन देऊन सदर टोळी मुलींना मध्यप्रदेशात घेऊन जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू टोळीशी संबंधित अन्य गुन्हेगारांना अटक करण्याबाबत तसेच उक्त अल्पवयीन मुलींना त्यांच्या घरी परत पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) मुलींच्या पालकांनी आरोपीकडून (रा.मध्यप्रदेश) रु.५५,०००/- हुंडा घेवून दोन मुलींची विक्री केली आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, धारणी येथे अप.क्र.३१/१६ कलम ३६३, ३६६(अ), ३७०(अ)(१)(२), ३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींनी पिडीत मुलींसोबत शारिरीक संबंध केल्याचे आणि अल्पवयीन मुलीसोबत आरोपीने लग्न केल्याचे सदर गुन्ह्यामध्ये कलम ३७६ (२) (आय)(ज) भादवि सह कलम ६ बाल लौंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ आणि बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ ची कलम ९,१०,११ समाविष्ट करण्यात आले आहे. दोन्ही मुलींच्या वडीलांसह एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्ह्यात वापरलेले वाहन व रु.५०,०००/- जप्त करण्यात आले आहेत. दोन पिडीत मुलींपैकी एका मुलीच्या काकाच्या ताब्यात देण्यात आले असून, दुसरी अल्पवयीन मुलीचे कोणी नातेवाईक ताब्यात घ्यायला तयार नसल्याने अमरावती येथील बाल निरीक्षण गृहामध्ये ठेवण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारघर (नवी मुंबई) येथे सिडकोच्या राखीव भुखंडावर बेकायदेशीररित्या मातीची विल्हेवाट लावणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करणेबाबत

**(३९) * १८०६१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथे सिडकोच्या जागेत सेक्टर ३३ मध्ये प्लॉट नं.२ या राखीव भुखंडावर परवानगी न घेता बेकायदेशीररित्या मातीची विल्हेवाट लावणाऱ्या ठेकेदाराच्या विरोधात सिडकोच्या अधिकाऱ्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सेंट्रल पार्क, खारघर येथे मातीचा भराव होत असल्याचे कळल्यानंतर सिडकोच्या अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी केली. सदर ठिकाणी ८ डंपर आढळून आल्याने पोलीस स्टेशन, खारघर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे व संबंधितांविरुध्द पोलीसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उत्तन (भाईंदर) येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(४०) * १८०८१ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तन (भाईंदर) येथील घनकचरा प्रकल्पात उघडयावर साठविण्यात येणारा कचरा गेल्या आठ दिवसांपासून घुमसत असून धुरामुळे येथील नागरिक त्रस्त झाले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प गत दोन वर्षापासून बंद असल्याने या प्रकल्पाच्या आसपास कचरा उघड्यावरच साठवला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी हा प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) उत्तन-पाली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणी उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला नैसर्गिकरित्या तुरळक आग लागत असते.

मात्र कचऱ्याला लागलेली आग विझविण्याकरिता कचऱ्यावर मॅग्नेशियम क्लोराईड या रसायनाची नियमित फवारणी करण्याची उपाययोजना महानगरपालिकेकडून करण्यात येते.
(२) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन-पाली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प काही तांत्रिक कारणांमुळे दिनांक २५/१०/२०१३ पासून बंद आहे.

तथापि मिरा-भाईंदर शहरातून जमा होणारा दैनंदिन घनकचरा मौजे उत्तन-पाली येथे सद्यस्थितीत बंद असलेल्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पालगत असलेल्या मोकळ्या जागेत महानगरपालिकेकडून टाकण्यात येतो. या ठिकाणी टाकण्यात येत असलेल्या घनकचऱ्यावर बायोकल्चरची फवारणी, पोकलन/डोझर मशीनच्या माध्यमातून वेळीच सपाटीकरण करुन मातीचे कॅपिंग करणे, आग विझविण्याकरीता कचऱ्यावर मॅग्नेशियम क्लोराईड या रसायनाची नियमित फवारणी करणे इत्यादी स्वरुपाच्या तात्पुरत्या उपाययोजना महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
(३) उत्तन-पाली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाऐवजी घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यायी जागेवर उभारण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून मौजे सकवार येथे जागा उपलब्ध करण्यात आली असून याकरीता वन खाते वगळता इतर संबंधित प्राधिकरणांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून याबाबत वन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

दरम्यान मौजे सकवार येथे सदर प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणून शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा निरी, मुंबई किंवा आय.आय.टी., पवई यांच्याशी सल्लामसलत करुन विदयमान उत्तन पाली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणी लघु शास्त्रोक्त भस्मीकरण केंद्र उभारणे किंवा समुचित घनकचरा व्यवस्थापन करण्याबाबत हरित लवाद, पुणे यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार

मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून आय.आय.टी., मुंबई यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. आय.आय.टी., मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या तांत्रिक अहवालानुसार उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया प्रस्तावित असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शहरातील कचऱ्यांवर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याबाबत महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतून हुतात्मा चौकाच्या मूळ नामकरणाच्या प्रस्तावाची कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत**

**(४१) * १८१०१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात फ्लोरा फाऊंटन येथे अनेक जण हुतात्मा झाले तद्नंतर याचे नाव हुतात्मा चौक करण्यात आले या मूळ नामकरणाच्या प्रस्तावाची कागदपत्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेतून गहाळ झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतकी महत्वाची कागदपत्रे गहाळ होण्यास कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या अखत्यारितील अशा अनेक प्रस्तावांच्या कागदपत्रांचे संवर्धन करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) संयुक्त महराष्ट्राच्या लढ्यातील हुतात्म्यांना श्रध्दांजली निमित्त तत्कालीन प्रशासनाने सन १९६१-६२ दरम्यान फ्लोरा फाऊंटन या चौकाचे हुतात्मा चौक असे नामांतर केल्याबाबतची कागदपत्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आढळून येत नाहीत.

(२) सदर कागदपत्रांचा शोध आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत घेण्यात येत आहे.

(३) महानगरपालिकेच्या अखत्यारितील अशा अनेक प्रस्तावांच्या कागदपत्रांचे संवर्धन करण्यासाठी प्राथमिकतेनुसार दस्ताऐवजांची नियत वर्गानुसार विभागणी करुन कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई नाशिक-महामार्गावरील कोपरी येथील उड्डाणपुलाचे रुंदीकरण करण्याबाबत

**(४२) * १८२०६ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील मुंबई-नाशिक महामार्गावरील कोपरी येथील उड्डाणपूलाचे रुंदीकरण करण्यासाठी १०० कोटी रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपूलाच्या रुंदीकरणाच्या कामास कैंव्हा सुरुवात होणार आहे व सदर रुंदीकरणाचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे शहरातील मुंबई नाशिक महामार्गावरील कोपरी येथील उड्डाणपूलाचे रुंदीकरणाचे काम मंजूर झाले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) रुंदीकरणाच्या प्रत्यक्ष कामास पावसाळयानंतर ऑक्टोबर, २०१६ मध्ये सुरुवात होऊन त्यानंतर ३ वर्षाच्या कालावधीत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

## गिरगाव (मुंबई) येथे आयोजित मेक इन इंडिया मधील सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान व्यासपीठास लागलेल्या आगीच्या घटनेबाबत

**(४३) * १८५२६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरगाव (मुंबई) येथे आयोजित मेक इन इंडिया मधील सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान व्यासपीठाला मोठी आग लागल्याची घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमादरम्यान घडलेल्या या घटनेत मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आगीची दुर्घटना नियोजनाचा अभाव आणि योग्य काळजी न घेतल्याने घडली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर आगीची दुर्घटना सदोष विद्युत प्रणालीमुळे घडली असल्याचे आढळून आले असून डॉ.दा.भ. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ५६/२०१६, भा.दं.वि.सं. कलम २८५, ३३६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली येथे कृषी औषध विक्रीच्या दुकानात विनापरवाना कृषी औषधे विक्रीस ठेवल्या प्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्याबाबत**

**(४४) * १८८२८ श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील कुपवाड रस्त्यावरील बालाजीनगर येथे कृषी औषध विक्रीच्या दुकानात विनापरवाना कृषी औषधे विक्रीस ठेवल्या प्रकरणी दोघांवर संजयनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक सांगली यांचे फिर्यादीवरुन संजयनगर पोलीस ठाणे, सांगली येथे २ आरोपींविरुध्द गु.र.नं.९/२०१६, अत्यावश्यक वस्तु

अधिनियम १९५५ चे कलम ३ (२) (a) (d) तसेच किटकनाशक कायदा १९६८ चे कलम ३ (k), ९ (१), ९ (३-b), ९ (४), १३ (१), १७ (a), १७ (d), १८ (a)(c) व किटकनाशक नियम १९७१ चे नियम क्र. ६ (१), ९ (१), १० (१), १०(४-A) i, १५ (२), १६, १७(१), १८, १९(iii), १९(३) (४)(७) प्रमाणे दि. ०६/०१/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) घटनास्थळावरुन जप्त केलेल्या जैविक किटकनाशकाचे नमुने विश्लेषक किटकनाशक तपासणी प्रयोगशाळा, पुणे व जैविक खताचे नमुने खत तपासणी प्रयोग शाळा, कोल्हापूर येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार विक्री करण्यात येत असलेले जैविक खते व किटकनाशके विहित मानकाप्रमाणके नसल्याचे आढळून आले आहे.

तंत्र अधिकारी गुणनियंत्रणद्वारे विभागीय कृषी महासंचालक कोल्हापूर यांनी सदर तारा ॲग्रो सर्विसेस या कंपनीचा विक्री परवाना रद्द केला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागामधील संगणक निदेशक पदास सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(४५) * १८९३० श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागामधील संगणक निदेशक पद दिनांक ३१ जुलै, १९९७ ला (१४००-२६००) वेतनश्रेणीत निर्मित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणक निदेशक पदाना सुधारित वेतनश्रेणी दिनांक १७ जानेवारी, २००४ रोजीचा शासन निर्णय लागु झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संगणक निदेशक पदांना सुधारित वेतनश्रेणी मिळणेसाठी प्रस्ताव क्र-४/आस्था/२००५(२३५) दिनांक १६ एप्रिल २००५ ला संचालकानी शासनास सादर केला होता तसेच या पदांना विधानसभा आश्वासन १०६८ नुसार सुधारित वेतनश्रेणी (५५००-९०००) लागु करणे आवश्यक असल्याचे संचालकाने शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २५/७/२००७ च्या पदाच्या आढाव्यात संगणक निदेशक पद (१४००-२६००) वेतनश्रेणीत दर्शविण्यात आले असून राज्य वेतन सुधारणा समिती २००८ मा.हकीम यांनी सैनिकी शाळेतील संगणक निदेशकांन (pay band-२९३००-३४८०० ग्रेड पे ४३००) प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संगणक निदेशक पद दिनांक ३१/७/१९९७ ला निर्मित झाले, त्याच शासन निर्णयामध्ये निर्माण झालेल्या निदेशक प्रमाणपत्र अभ्यासक्रम (१२००-२०४०) यांना सुधारित वेतन श्रेणी (४५००-७०००) लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागामध्ये कर्तव्यावर असलेल्या संगणक निदेशक पदाच्या वेतनश्रेणीबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सदर नस्ती सन २००५ मधील असल्याने उपलब्ध होवू शकली नाही. त्यामुळे प्रस्ताव सादर केला किंवा कसे ते स्पष्ट होत नाही.

(४) नाही. तथापि या विभागाच्या अधिपत्याखालील तंत्रशाळेतील निदेशकांना ९३००-३४८०० व ग्रेड पे ४२०० या वेतनश्रेणीत वेतन मंजूर करण्यात आले आहे.

(५) होय.

(६) वित्त विभाग महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ अन्वये संगणक निदेशक पदाची सुधारीत वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००/- अशी दर्शविण्यात आली असून त्यानुसार लागू करण्यात आली आहे.

-----------------

## अंधेरी (मुंबई) पश्चिम येथील मधुकुंज को.ऑप.हौ.सोसायटीच्या इमारतीचा विकास करताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४६) * १९११५ श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) पश्चिम येथील मधुकुंज को.ऑप.हौ.सोसायटीच्या इमारतीचा विकास करताना अभिहस्तांतरण पत्र नसणे, विकास करारनाम्यामध्ये सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या नसणे, तसेच ३५ फ्री फन्जीबल एफएसआय चा एरिया रहिवाशांना न देता बनावट कागदपत्रे बनवून मुंबई महानगरपालिकेने आय.ओ.डी.क्रमांक सीएचई/डब्ल्यू/०९०६/के/३३९ (नविन), दिनांक १ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यासुमारास दिली असल्याबाबत व विकासकास सदरहू इमारत बांधण्यास परवानगी दिल्याबाबत संबंधित रहिवाशांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सन २०१५-२०१६ मध्ये वारंवार लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई महानगरपालिकेच्या के-वार्ड येथील अधिकाऱ्यांनी हस्तांतरण करारपत्र, मुद्रांक पत्र, विकास करारनामा इ.कागदपत्रे नसताना व सोसायटीच्या इतिवृत्तावर सचिव व अध्यक्षांची सही नसताना बनावट कागदपत्रे बनवून आय.ओ.डी आणि सी.सी.कराराबाबतही तक्रारी करण्यात आल्या आहेत तसेच सदरहू विकासकाने इमारती बांधण्याचा केलेला करार हा संपूर्णपणे बनावट कागदपत्राच्या आधारे केला असल्याचे तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आय.ओ.डी. दिल्यानंतर पुन्हा इमारत पाडण्याची नोटीस चुकीच्या पध्दतीने पाठवून इमारत दिनांक २७ मे, २०१४ रोजी वा त्यासुमारास तोडून तेथील ७० रहिवाशांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करून या रहिवाश्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंधेरी (मुंबई) पश्चिम येथील मधुकुंज को.ऑप.हौ. सोसायटीच्या इमारतीचा विकास करताना अभिहस्तांतरण पत्र नसणे, विकास करारनाम्यामध्ये सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या नसणे, तसेच ३५ फ्री फन्जीबल एफएसआय चा एरिया रहिवाशांना न देता बनावट कागदपत्रे बनवून मुंबई महानगरपालिकेने आय.ओ.डी. दिली असल्याबाबत व विकासकास सदरहू

इमारत बांधण्यास परवानगी दिल्याबाबत संबंधित एका रहिवाशाने सन २०१५-२०१६ मध्ये लेखी तक्रार केल्या आहेत, हे खरे आहे,

(२) न.भू.मा.क्र. ३७० (१ते२३) व्हिलेज-अंधेरी (पश्चिम) येथे मधुकुंज सोसायटीच्या दोन इमारती होत्या, दोन इमारतींपैकी क्र.१ ही तळ+४ मजले व इमारत क्र.२ ही काही भाग तळ + २ मजले व काही भाग तळ + १ मजला प्रमाणे होती.

वास्तुविशारदाने सादर केलेल्या मालमत्ता पत्रकानुसार सदर भुखंडाची मालकी मे.फजल कन्स्ट्रक्शन यांच्याकडे आहे. त्यानुसार मे.फझल कन्स्ट्रक्शन यांनी नोंदणीकृत मुखत्यारपत्राने विकासाचे अधिकार मे.ओम रिम अरहम डेव्हलपर्स यांना प्रदान केले.

वास्तुविशारदाने सदर भूखंडावरील दोन्ही इमारतीमधील एक सदस्य वगळता इतर ६५ सदस्यांचे सामुहिक मान्यतापत्र घेऊन सदर भूखंडावर पुनर्विकास प्रकल्पाचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केला होता.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार पुनर्विकास प्रस्तावाची छाननी करुन विकासकास इमारत बांधकामास परवानगी देण्यात आलेली आहे.

विकासकाने प्रस्तावासोबत सादर केलेले सामायिक मान्यतापत्र, नोंदणीकृत वटमुखत्यारपत्र व मालमत्ता पत्रक, इत्यादी कागदपत्राच्या आधारे आय.ओ.डी. देण्यात आली आहे.

दिनांक ०१.०८.२०१३ रोजी महानगरपालिकेने मंजूरील दिलेल्या नकाशाप्रमाणे विकासकाने इमारत क्र. १ व इमारत क्र. २ चा तळ + १ मजल्याचा भाग निष्कासित केला होता. उर्वरित तळ + २ मजले हा भाग मोडकळीस आलेल्या अवस्थेत होता. सदर भाग एक रहिवाशी वगळता पुर्णत: रिकामा होता. इमारतीचा हा भाग मोडकळीस आलेला असल्यामुळे पुढील अनर्थ टाळण्यासाठी दिनांक १७.०४.२०१४ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम ३५४ अन्वये इमारत निष्कासित करण्यासाठी महानगरपालिका मार्फत नोटीस बजावण्यात आली.

दरम्यान दिनांक ०९.०५.२०१४ रोजी त्या इमारतीचा काही भाग रस्त्यावर कोसळल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिका, अग्निशमन दल व स्थानिक पोलीस ठाणे यांना प्राप्त झाली. सदर इमारतीच्या भागात एक रहिवाशी वगळता संपूर्ण इमारत रिकामी होती व त्यानुसार अग्निशमन दलाने सदर मोडकळीस आलेल्या रिकाम्या भागातील राहत असलेल्या त्या एका रहिवाशाला त्याच्या मौल्यवान वस्तूंसह इमारतीतून सुखरुप बाहेर काढले.

त्यामुळे महानगरपालिकेने इमारत तोडून तेथील ७० रहिवाशांची फसवणूक केली, हे म्हणणे संयुक्तिक नाही.
(३) संबंधित एका रहिवाशाने दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. न्यायालयीन आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयाभोवती**
**कचरा व घाण मोठ्या प्रमाणात पसरल्याबाबत**

**(४७) * १९१२६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट, मुंबई येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयाभोवती कचरा व घाण मोठ्या प्रमाणात पसरली असल्यामुळे कार्यालयीन कर्मचारी व कार्यालयात कामासाठी येणारे नागरिक यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कचरा महापालिकेने वा अन्न व औषधी प्रशासन कार्यालयाने साफ करायचा याबाबत वाद असून या वादात संबंधितांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याने स्थानिक नागरिकांच्या याबाबत तीव्र प्रतिक्रिया आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
अन्न व औषध प्रशासन कार्यालयाच्या आवारातील साफसफाई करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाची असून, सदर कार्यालयाच्या आवाराबाहेरील रस्त्याची साफसफाई करण्याची जबाबदारी ही बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे. त्यानुसार सदर ठिकाणची साफसफाई करण्यात येत असून यासंदर्भात दोन्ही कार्यालयामध्ये कोणताही वाद नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आधारवाडी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील डंपिंग ग्राऊंडचे बारावे येथे होणारे स्थलांतर रोखण्याबाबत

**(४८) * १९१९० श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार आधारवाडी डंपिंग ग्राऊंड शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेने मागविलेल्या निविदेला स्थायी समितीने मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधारवाडी डंपिंग ग्राऊंडचे स्थलांतर बारावे येथे करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आधारवाडी डंपिंग ग्राऊंडचे स्थलांतर बारावे येथे रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याकरीता मौजे उंबर्डे, मांडा व बारावे येथे शास्त्रोक्त भरावभूमी उभारण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, आधारवाडी येथील क्षेपणभूमी बारावे येथे स्थलांतरीत करण्यात येत नसून तेथे घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

आधारवाडी येथील क्षेपणभूमीची क्षमता संपली असल्याने ती शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेत मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना डावलून इतर लोकांना नोकऱ्या देण्यात आल्याबाबत

**(४९) * १४८३० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील मृत कर्मचाऱ्यांच्या जागेवर बनावट कागदपत्रे तयार करुन मृतांच्या कुटुंबियांना डावलून इतर लोकांना नोकरी देण्याची व त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या पोलीस तपासादरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेतील काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा दिसून आल्यामुळे पोलीस यंत्रणेमार्फत त्यांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस यंत्रणेमार्फत अटक करण्यात आलेल्या सदर कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेमार्फत निलंबित केले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

गुन्हे अन्वेषण विभागाच्या दिनांक १.१२.२०१५ च्या पत्रान्वये, १२ अनुकंपा तत्वावरील नोकरी प्रकरणांची माहिती महानगरपालिकेकडून मागविण्यात आली होती. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

सदर प्राथमिक चौकशीमध्ये आढळून आलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

- अनुकंपा प्रकरणांतर्गत पात्र ठरविण्याकरिता शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, मयत कर्मचाऱ्याचा मृत्यू दाखला, पॅनकार्ड, आधार कार्ड, रेशनकार्ड, पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र इ. कागदपत्रे फेरफार करून सादर करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

- अनुकंपा प्रकरणांतर्गत पात्र ठरविण्याकरिता वारसदार नसतांनाही अन्य व्यक्तींची नावे निर्देशित करून प्रकरणे सादर करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.
- तसेच, कार्यालयीन कागदपत्रांवरदेखील कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरी करून प्रस्ताव सादर केला असून त्यास मंजुरी घेतल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील परेल विभागातील टाटा रुग्णालयामध्ये कर्करोगावर उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांच्या निवासाची व्यवस्था करण्याबाबत**

**(५०) * १४६७७ श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परेल विभागातील टाटा रुग्णालयामध्ये कर्करोगावर उपचार घेण्यासाठी आजारी वडीलासोबत आलेल्या ३ वर्षाच्या मुलीचा थंडीच्या कडाक्यामुळे मृत्यू झाल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपचारासाठी आलेले सदर कुटुंब हे अर्धउघड्या झोपडीमध्ये राहत असल्याने या मुलीचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये दाखल होण्याकरिता अशा अनेक रुग्णांना रुग्णालयाच्या बाहेर दिवसेंदिवस राहून दाखल होण्याकरिता प्रतिक्षा करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टाटा रुग्णालयामध्ये कर्करोगावर उपचार घेण्यासाठी येणा-या लक्षणीय रुग्णांची तात्पुरती व्यवस्था केल्यास मृत्यूशी झुंज देणा-या रुग्णांचे प्राण वाचविले जाईल याकरिता शासनाद्वारे काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मृत्यू नोंदणीनुसार, दि. ६ जानेवारी, २०१५ रोजी टाटा रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी आजारी वडिलांसोबत आलेल्या ३ वर्षांच्या मुलीचा थंडीच्या कडाक्यामुळे मृत्यू झाल्याची नोंद नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मृत्यू नोंदणीनुसार दि. ६ जानेवारी, २०१५ रोजी बीडीडी चाळ नं.१, महात्मा फुले रोड, दादर येथील पाच वर्षांखालील लहान मुलीच्या मृत्यूची नोंद झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कर्करोग निवारणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालय येथे ७५ खाटांचा रेडिएशन ऑन्कॉलॉजी विभाग कार्यरत आहे. तसेच, सायन रुग्णालय येथे कर्करोग रुग्णांसाठी बाह्यरोग विभाग व उपचार (किमोथॅरॅपी) पध्दती कार्यरत आहे.

याशिवाय भांडुप येथे सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासंदर्भात महापालिकेमार्फत प्रक्रिया सुरु आहे. या रुग्णालयात इतर विशेष उपचारांसमवेत कर्करोगग्रस्त रुग्णांवर उपचारांची सुविधा उपलब्ध असेल.

टाटा रुग्णालयामध्ये कर्करोगावर उपचार घेण्यासाठी येणाऱ्या परंतु निवारा नसलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्याची तरतूद बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नसली तरी काही अशासकीय संस्था याबाबत पुढाकार घेतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील स्वाईन फ्ल्यूच्या आजारावर नियंत्रण मिळविण्याबाबत**

**(५१) * १८३५२ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे थंडीची तीव्रता वाढल्याने स्वाईन फ्ल्यू संशयीत रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून दोन जणांचा मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वाईन फ्ल्युच्या आजारावर नियंत्रण मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे जानेवारी, २०१६ मध्ये ५३ संशयित रुग्ण आढळून आले असून, त्यापैकी केवळ ६ रुग्ण स्वाईन फ्ल्यू बाधीत असल्याचे आढळले आहेत व त्यातील २ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) पुणे महानगरपालिकेमार्फत स्वाईन फ्ल्यू आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी, पुणे महानगरपालिकेतर्फे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. :-

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालयासहित ५९ दवाखाने / रुग्णालयाकडील स्वाईन फ्ल्यू प्राथमिक उपचार केंद्र तसेच २० खाजगी रुग्णालयामार्फत स्वाईन फ्ल्यूबाबत तपासणी, उपचार व लसीकरण करण्यात येत आहे.

जनजागृतीसाठी दैनंदिन वृत्तपत्र, रेडिओ, पथनाट्य, विभागनिहाय चर्चा सत्र इत्यादी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

पुणे शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

उच्च दर्जाच्या उपचार प्रोटोकल्सच्या प्रती सर्व खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांना वितरित करण्यात आल्या.

साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्याकरिता महानगरपालिका स्तरावर एक समिती तयार करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील विद्यार्थ्यांच्या मासिक व त्रैमासिक पासचे दर कमी करण्याबाबत**

**(५२) * १५४६५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विद्यार्थ्यांच्या मासिक व त्रैमासिक पासाचे दर कमी करण्याबाबत बेस्ट प्रशासनाला मा.वित्त मंत्री यांनी सूचना केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूचनेनुसार शासनाने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बेस्ट उपक्रमाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ पासून मुंबईतील विद्यार्थ्यांच्या मासिक व त्रैमासिक बसपास दरात कपात केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर महानगरपालिकेतील एलबीटी विभागातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५३) * १५७११ श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या एलबीटी विभागातील गैरव्यवहार प्रकरणी महानगरपालिका आयुक्तांनी सुरु केलेल्या चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या ५० कर्मचाऱ्यांना आयुक्तांच्या आदेशान्वये दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास सामान्य प्रशासन विभागाने कारणे दाखवा नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या नोटीसीमध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप कोणते व त्या आरोपांचा कर्मचाऱ्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचा अभ्यास पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यामध्ये दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) तसेच, एलबीटी विभागातील ९० टक्के व्यापाऱ्यांनी वर्षानुवर्षे वार्षिक विवरण पत्रे सादर न करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली तसेच या व्यापाऱ्यांना सहकार्य करणारे महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी, नगरसेवक इत्यादींचा सहभाग या एलबीटी गैरव्यवहारामध्ये असल्याचे चौकशीत निष्पन्न होऊनही त्यांचेविरुध्द कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे स्थानिक संस्था कराच्या वसुलीमध्ये घट झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने दिनांक १८.१२.२०१५ रोजीच्या नोटीशीन्वये ६२ कर्मचाऱ्यांचा खुलासा मागविला होता.

(२) व (३) सदर कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या नोटीसीमध्ये त्यांच्यावर खालील आरोप ठेवण्यात आलेले आहेत :-

- कामात हलगर्जीपणा व दिरंगाई
- कर्तव्य पालनात कसुरी
- कर्तव्य परायनतेचा अभाव
- सचोटीचा अभाव

सदर कर्मचाऱ्यांकडून प्राप्त खुलाशांची छाननी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. छाननीनंतर दोषी आढळून येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द महापालिकेमार्फत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) स्थानिक संस्था कर हा व्यापाऱ्यांच्या लेखा पुस्तकांवर आधारीत आहे व हा कर भरण्याची कायद्यानुसार प्राथमिक जबाबदारी ही व्यापाऱ्यांची आहे. सदर व्यापाऱ्यांनी त्यांची विवरण पत्रे भरलेली असोत अथवा नसोत, महानगरपालिकेने या सर्वांची निर्धारणा करणे कायद्याने अभिप्रेत आहे.

अशाप्रकारे निर्धारणा करते वेळी कर भरण्यात केलेला कसूर लक्षात येईल व असा राहिलेला कर व्याज व दंडासहित वसुल केला जाईल व महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही याकरिता कर वसुली करणेकरिता योग्य ती तपासणी व करनिर्धारणा करून कर वसुली करण्याकरिता ५ सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत ५५० करनिर्धारणा पूर्ण करून कर व्याज, दंड वसुली व परतावा अमान्य करून सुमारे रुपये २.५ कोटी वसुल केले आहेत.

-----------------

## येवले शहराला भुयारी गटारी योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानामधून निधी मंजुरीबाबत

**(५४) * १४९५८ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवले शहराला भुयारी गटारी योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानामधून निधी मंजुरीसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दिनांक २६ जून, २०१५ रोजी शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव माहे ऑक्टोंबर, २०१५ पर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवले शहरासाठी भुयारी गटार योजनेच्या प्रस्तावास सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानामधून मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४)

- येवला नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्प केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला होता.
- तथापि सदर प्रकल्पास युआयडीएसएसएमटी योजनेतून निधी उपलब्ध झाला नाही.
- केंद्र शासनाकडून निधी मिळण्यापूर्वीच नगरपरिषदेने सदर कामाची निविदा काढून काम सुरु केले.
- आता सदर प्रकल्प सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातून मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तो शासनाच्या विचाराधीन आहे.
- मात्र हा प्रकल्प नव्याने मंजूर करताना पुन्हा निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असून अगोदरच सुरु केलेल्या कामासाठी शासनाकडून निधी अनुज्ञेय राहणार नाही.

-----------------

## पुणे महापालिका मंडळाकडे संगणकाच्या देखरेखीसाठी यंत्रणा नसल्याने शाळेतील संगणक वापराविना पडून असल्याबाबत

**(५५) * १५७८९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील शाळांमध्ये ई-लर्निंग सुरु करणाऱ्या महापालिका शिक्षण मंडळाकडे संगणकाच्या देखभाल दुरुस्तीची यंत्रणा नसल्याने मंडळाच्या शाळेतील संगणक वापराविना पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार महापालिका शिक्षण मंडळाच्या शाळेतील किरकोळ दुरुस्तीअभावी वापराविना पडून असलेल्या संगणकाचा वापर व्हावा म्हणून दुरुस्ती व देखभालीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता सन २००४ पासून सुरु करण्यात आलेल्या संगणक प्रशिक्षणासाठी वेळोवेळी खरेदी करण्यात आलेल्या संगणकाच्या दुरुस्तीचे व संगणक प्रशिक्षणाचे काम सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापूर्वी निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येत होते. तथापि, सन २०१४-१५ पासून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) या संस्थेस संगणक प्रशिक्षणाचे काम देण्यात आले होते.

पुणे शिक्षण मंडळाकडे असलेल्या संगणकापैकी अंदाजे ५०% संगणक नादुरुस्त किंवा कालबाह्य झाले असल्याने, सदर कालावधीत संगणकाची दुरुस्ती करण्यात आली नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून संगणक दुरुस्ती व संगणक प्रशिक्षणाकरिता नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेतील पहिला प्रकल्प सैफी बुऱ्हाणी अपलिफटमेंट ट्रस्टच्या (एसबीयुटी) गृहनिर्माण प्रकल्प भेंडीबाजार येथे सुरु करण्यात आल्याबाबत

**(५६) * १६८१० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेतील पहिला प्रकल्प सैफी बुऱ्हाणी अपलिफटमेंट ट्रस्टचा (एसबीयुटी) भव्य गृहनिर्माण प्रकल्प भेंडीबाजार येथे सुरु करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राबविण्यात आलेल्या पहिल्या मोठ्या महत्वाकांक्षी क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेची रुपरेषा काय आहे,

(३) असल्यास, सदरील प्रकल्प किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) तसेच, सदरील प्रकल्पात बाधित होणाऱ्या कुटुंबांच्या व व्यापा-यांच्या तात्पुरत्या स्थलांतराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(९) अंतर्गत भेंडीबाजार येथील सैकी बुऱ्हाणी अपलिफमेंट ट्रस्टच्या नागरी नुतनीकरण योजनेच्या प्रकल्पास (Cluster Development) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) या योजनेचे क्षेत्र ६५८८०.४० चौ.मी. इतके आहे. त्यामध्ये एकूण २८० भूभागांचा समावेश असून त्यामध्ये २४५ इमारती आहे. सदर इमारतींमध्ये ३२०० निवासी सदनिका व १२५० अनिवासी सदनिका अंतर्भूत आहेत.

सदर योजनेचा अभिन्यास आराखड्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १६.१.२०१५ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर योजना दोन टप्प्यामध्ये विभागण्यात आलेली असून मंजूर अभिन्यासाप्रमाणे एकंदर नऊ प्रभाग आहेत. त्यामधील दोन प्रभागांमध्ये प्रस्तावित केलेल्या इमारतींचे काम सुरु झालेले आहे. इतर प्रभागामधील इमारतींचा विकासही टप्प्याटप्प्याने होणार आहे.

(३) सदर प्रकल्प पूर्ण होणेस ८ ते १० वर्ष कालावधी लागण्याची शक्यता आहे.

(४) व (५) सदर प्रकल्पाचे काम टप्याटप्याने प्रस्तावित असुन प्रकल्पामधील रहिवाशी यांच्या तात्पुरत्या स्थलांतराबाबत संक्रमण शिबिराची व्यवस्था करणेची जबाबदारी विकासक यांची आहे. सध्या निवासी रहिवाशी यांना न्यू हिंद मिल येथील म्हाडाचे ट्रान्झीट कॅम्प येथे व अनिवासी रहिवाशांना मफतलाल शॉपिंग सेंटर येथे तात्पुरते स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

-----------------

**पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या गणवेशाचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत**

**(५७) * १५०९९ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या गणवेशाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गणवेशाचा दर्जा सुधारण्याकरीता व निकृष्ट दर्जाचा गणवेश देणाऱ्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

गणवेशाचे नमुने खरेदीपूर्वी तसेच खरेदीनंतर शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासून घेण्यात आले असून, गणवेश मानकांप्रमाणे (स्पेसिफिकेशनप्रमाणे) असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील दुकाने, उपहारगृहे रात्री ११ वाजेपर्यंत सुरु ठेवण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(५८) * १७५५० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दुकाने उपहारगृहे आठवड्याचे संपूर्ण सातही दिवस पहाटे ५ पासून रात्री ११ वाजेपर्यंत सुरु ठेवण्याची तरतूद असलेल्या किरकोळ आस्थापना धोरणास दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी कधीपासून होणार आहे,

(३) असल्यास, त्यामुळे वाहतुक आणि ध्वनीप्रदुषणात वाढ होणार असुन शासनाने या संभाव्य वाढणाऱ्या प्रदुषणाचा अभ्यास केला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शासनाने दिनांक १०.२.२०१६ रोजी शासन निर्णयानुसार राज्याचे किरकोळ व्यापारी धोरण २०१६ यास मान्यता दिली आहे.

(२) जे किरकोळ उपक्रम सर्व वस्तु आणि माल यांचा व्यवहार करतात त्यांना सकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत व्यवसाय करण्याची मुभा देण्यात येईल. तसेच फक्त लॉजिस्टीक्स आणि पुरवठा या कारणासाठी हे उपक्रम रात्री ११ ते सकाळी ५ वाजेपर्यंत खुले राहू शकतील.

(३) उक्त किरकोळ व्यवसाय हा वस्तू आणि माल यांच्याशी संबंधित असून त्यात उत्पादन प्रक्रिया समाविष्ट नसल्याने प्रदुषणाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलावपाळी ठाणे (पश्चिम) येथील तरुणाने बनावट मुद्रांक व शासकीय रबर शिक्क्यांच्या केलेल्या गैरवापराबाबत

**(५९) * १६३५२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलावपाळी ठाणे (पश्चिम) येथे अशोक अरुण खरात या तरुणाला बनावट मुद्रांक व बनावट शासकीय रबर शिक्क्यांसहीत नौपाडा पोलिसांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्याकडून शासनाचा बनावट मुद्रांकाचा साठा व छपाई यंत्रणा हस्तगत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

अशोक अरुण खरात यास नौपाडा पोलीसांनी अटक केली नसुन मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा ठाणे शहर या पोलीसांनी नौपाडा, ठाणे येथे अटक केली आहे. त्यांचे विरुध्द नौपाडा पोलीस स्टेशन येथे दि.०२.०२.२०१६ रोजी गुन्हा रजिस्टर नंबर ३७/२०१६ भारतीय दंड विधान कलम ४६७, ४६८, ४७१, ४७२, ४७३, ४७४, ४२०, २५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर गुन्हयाचे तपासात आरोपी अशोक अरुण खरात यांचे कडून अद्याप पावेतो मुद्रांक छपाई यंत्रणाबाबत कोणतीही माहिती मिळून आलेली नाही. तो स्टॅम्प वेंडर कडून मुद्रांक खरेदी करुन त्यावरील मुद्रांक विक्री तारीख रिन व्हाईटनर च्या सहाय्याने पुसून ज्या ग्राहकास जुन्या तारखेचा स्टॅम्प पेपर पाहिजे त्या तारखेचा रबरी शिक्का मुद्रांकावर मारुन सदर मुद्रांक जुने असल्याचे भासवून ते ग्राहकास विक्री करीत असे.

आरोपी कडून हस्तगत केलेला मुद्देमाल :-

१) १,१५,०००/- रु. त्यात ५००/- रु. दराचे १७८ शासकीय मुद्रांक, १००/- रु. दराचे २४३ मुद्रांक, ५०/- रु. दराचे २६ शासकीय मुद्रांक, रोख रक्कम ४००/- रु. (एकूण ४४७ शासकीय मुद्रांक), एक लाईटबिल, एक सॅक बॅग, दोन बॉल पेन, तीन स्टॅम्प पॅड, एक रिन फॅब्रिक्स व्हाईटनर बाटली, दोन इअर बड्स, विविध प्रकारचे एकून ३३ रबरी शिक्के.

२) ५५५२.२५/- रु. त्यात २० रु. दराने १४ शासकीय मुद्रांक, १०/- रू. दराचे १२ शासकीय मुद्रांक, ५/- रु दराचे १६ शासकीय मुद्रांक, २/- रु. दराचे १० शासकीय मुद्रांक, १/- रू. दराचे एक, एक रुपया आठ आणे दराचा एक शासकीय मुद्रांक, ५०००/- रु. दराचा एक शासकीय मुद्रांक, असे एकूण ५६ शासकीय मुद्रांक, २ स्टॅम्प पॅड, २८ लाल रंगाचे रेड सिल, दोन बड्स, १ रिन फॅब्रिक्स व्हाईटनर बाटली, एकूण २२ रबरी शिक्के वेगवेगळया वर्णाचे, एक लाल रंगाची प्लॅस्टिक पिशवी. याचे बनावटीकरण करुन ते खरे म्हणून वापर व विक्री करण्याकरीता जवळ बाळगले. तसेच बनावटीकरण करण्याकरीता विविध प्रकारचे बनावट रबरी शिक्के असा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात आणखी एकास अटक करण्यात आली असुन, सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे आणि मुलुंड स्टेशन दरम्यानच्या प्रस्तावित विस्तारीत रेल्वे स्थानकास मनोरुग्णालयाच्या ताब्यातील जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६०) * १४९९७ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८९५ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि मुलुंड स्टेशन दरम्यानच्या प्रस्तावित विस्तारीत ठाणे रेल्वे स्थानकास ठाणे येथील मनोरुग्णालयाच्या ताब्यातील ३१ हेक्टर पैकी ६ हेक्टर जागा लागणार असल्याचा प्राथमिक अहवाल ठाणे महापालिकेने नेमलेल्या सल्लागाराने दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संदर्भिय प्रश्नाच्या उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार प्रस्तावित विस्तारीत ठाणे रेल्वे स्थानकासाठीचे चार पर्यायी अभियांत्रिकी नकाशे मध्य रेल्वेकडे मंजुरीसाठी केव्हा सादर करण्यात आले आहेत, तसेच सदर पर्यायांचे साधारणत: स्वरुप काय आहे

(३) त्याचप्रमाणे सुचविण्यात आलेल्या पर्यायांपैकी कोणत्या पर्यायास मध्य रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे व केव्हा,

(४) तसेच, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) प्रस्तावित विस्तारीत ठाणे रेल्वे स्थानकासाठीचे चार पर्यायी अभियांत्रिकी नकाशे मध्य रेल्वेकडे दिनांक १३.०३.२०१५ रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत:-

पर्याय १ :- सर्व रेल्वे लाईन्साठी (धीम्या व जलद) अंतरीम स्थानक (जलद रेल्वेमार्ग ४ मध्ये कोणतीही सुधारणा न करता)

पर्याय २ :- सर्व रेल्वे लाईन्ससाठी (धीम्या व जलद) अंतरीम स्थानक (धीम्या व जलद अशा सर्व रेल्वेमार्गामध्ये सुधारणा करुन)

पर्याय ३ :- धीम्या रेल्वे लाईन्ससाठी अंतरीम स्थानक व एक टर्मिनल लाईन

पर्याय ४ :- धीम्या व जलद अशा सर्व रेल्वे लाईन्ससाठी अंतरीम स्थानक व एक टर्मिनल लाईन

(३) मध्ये रेल्वेस सादर केलेल्या पर्यायी नकाशांपैकी कोणत्याही पर्यायास अद्याप मंजुरी दिलेली नाही.

(४) मध्य रेल्वेस सादर केलेल्या पर्यायी आराखड्याच्या मंजुरी संदर्भात ठाणे महानगरपालिकेमार्फत मध्य रेल्वेकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दादर (मुंबई) येथील कला पार्कची दुरवस्था झाल्याबाबत**

**(६१) * १४७७४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील मोक्याच्या विस्तीर्ण जागेत प्रमोद महाजन यांच्या स्मृती प्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या कला पार्कची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कला पार्कची दुरवस्था दूर करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन खात्यामार्फत सेनापती बापट मार्ग, दादर येथील मलनि:सारण प्रक्रिया केंद्राच्या विस्तीर्ण जागेवर प्रमोद महाजन कला पार्क या उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे.

माहे जानेवारी, २०१५ मध्ये सदर उद्यानाच्या परिरक्षणासाठी कंत्राटदार उपलब्ध नसल्यामुळे उद्यानातील हिरवळ व शोभिवंत झाडांचे काही प्रमाणात नुकसान झाले होते.

सदर उद्यान परिरक्षणाकरिता माहे एप्रिल, २०१५ मध्ये महापालिकेच्या उद्यान खात्याकडे हस्तांतरीत केल्यानंतर उद्यान खात्यामार्फत ४२ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर उद्यान सुस्थितीत आहे.

(२) सदर उद्यानाच्या देखभालीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली होती.

तसेच, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात उद्यानाच्या देखभालीकरिता आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------------

## राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या रक्षकांवर करण्यात येणारा प्रशिक्षणांचा खर्च लेव्हीमधून करण्यात आल्याबाबत

**(६२) * १४६५२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या रक्षकांवर करण्यात येणारा प्रशिक्षणांचा खर्च लेव्हीमधून करण्यात येवू नये असा निर्णय असतांनाही तो नियम सुरक्षा रक्षक मंडळाच्या अध्यक्षांकडून मोडून सुमारे २३५३ सुरक्षा रक्षकांचा प्रशिक्षणाचा खर्च त्यांच्या लेव्हीमधून करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त २३५३ प्रशिक्षित रक्षकांपैकी सुमारे १००० रक्षक हे सध्या मंडळाच्या पटलावरुन गायब झाल्याने शासनाचे नियम मोडून प्रशिक्षणासाठी केलेला ७० लाखांचा निधी वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही. कारण सुरक्षा रक्षकांच्या प्रशिक्षणावरील खर्च लेव्हीतून न करण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत. त्यामुळे प्रशिक्षणाचा खर्च प्रशासकीय लेव्हीतून करण्यात आलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही. कारण चौकशीअंती सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे यांनी आतापर्यंत २५४९ सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण दिले असून त्यापैकी २०९८ सुरक्षा रक्षकांना विविध आस्थापनेत मागणीप्रमाणे वितरीत केले आहे व उर्वरित प्रशिक्षण घेतलेले ४५१ सुरक्षा रक्षक मंडळाच्या प्रतिक्षा यादीवर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातील सिडको-हडको परिसरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(६३) * १९१४० श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील सिडको-हडको परिसरातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली असून प्रशासन त्याकडे लक्ष देत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अशंतः खरे आहे, नांदेड शहरातील सिडको हडको परिसरातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे.

(२) नांदेड शहरातील सिडको हडको परिसरातील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे महानगरपालिकेने हाती घेतली असून ती निधीच्या उपलब्धतेनुसार टप्याटप्याने पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातारा नगरपरिषद हद्दीत प्रथमेश चेम्बर्स, सदर बाजार येथे अनधिकृतपणे बांधकाम केल्याबाबत**

**(६४) * १६५३० श्री.जयंत पाटील, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा (जि.सातारा) नगरपरिषद हद्दीतील प्रथमेश चेम्बर्स, ४२४, सदर बाजार येथील गृहनिर्माण सह. संस्थेची कोणतीही परवानगी न घेता श्री.संजय मेहता यांनी अनधिकृतपणे पत्राशेड व देवालयाचे बांधकाम केले असून सदर सोसायटीतील महिला व मुलींची छेडछाड करणे त्यांना अपशब्दात बोलणे व तेथील रहिवाशांना मारहाण करण्याची धमकी देण्यात येत असल्याने तेथील रहिवाशांनी सदरहू व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत मुख्याधिकारी यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवदेन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरील अनधिकृत बांधकामाबाबत व तेथील रहिवाशांनी केलेल्या निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रथमेश चेंबर्स येथील फ्लॅटधारकांनी दि.१४/१/२०१६ रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद सातारा यांचेकडे याबाबत लेखी निवेदन दिले, हे खरे आहे.

यानुसार मुख्याधिकारी, नगरपरिषद सातारा यांनी श्री.संजय मेहता यांना दि. ३०/१/२०१६ रोजी नोटीस देऊन दि.३/२/२०१६ रोजी अनधिकृत पत्र्याची शेड काढून टाकली आहे.

याशिवाय प्रथमेश चेंबर्समधील फ्लॅटधारकांनी पोलीस निरिक्षक, सातारा शहर पोलीस ठाणे यांचेकडे केलेल्या तक्रार अर्जानुसार दोन्ही बाजूच्या लोकांना समोरासमोर बोलावून सोसायटीमधील लोकांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घेणेबाबत संबंधितांना समज देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील जैविक कचरा जमा करण्यासाठी नेमलेल्या कंपनीने कराराचा भंग केल्याबाबत**

**(६५) * १७३३५ श्री.सुभाष झांबड, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील प्रत्येक रुग्णालय, रक्तपेढ्यांमधील जैविक कचरा जमा करण्यासाठी महानगरपालिकेने १२ वर्षापूर्वी नाशिक येथील वॉटर ग्रेस कंपनीची नेमणूक केली आहे मात्र, या कंपनीने आतापर्यंत सर्व नियम, कराराचा भंग केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद शहरातील जैविक कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनी बरोबर सन २००३ मध्ये बोल्ट (BOLT) तत्वावर औरंगाबाद महानगरपालिकेने करार केला होता. करारातील अटीनुसार शहरातील संबंधित वैद्‌यकीय आस्थापनांकडून महानगरपालिकेने सेवा शुल्क वसूल करुन, त्यातून स्वामीत्व शुल्क कपात करुन, उर्वरित रक्कम कंपनीस दरमहा द्‌यावयाची आहे. तथापि, महानगरपालिकेने सन २००७ नंतर हे वसूलीचे काम मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनी यांच्याकडे सोपविले. स्थानिक निधी लेखा परिक्षा अहवालानुसार संबंधित वैद्‌यकीय आस्थापनाकडून सन २००७ नंतर सेवा शुल्काची वसूली न केल्यामुळे महानगरपालिकेचे रु. ३७.१० लक्षचे नुकसान झाल्याचे दर्शविले आहे.

(२) औरंगाबाद महानगरपालिकेकडून फेब्रुवारी, २०१६ पासून शहरातील वैद्यकीय आस्थापनांकडून जैविक कचरा विल्हेवाट शुल्क वसुली करण्यात येत आहे. लेखा परिक्षणातील नमूद थकीत रकमेची वसूली करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे देऊळगावराजा (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्याच्या आत्महत्येबाबत**

**(६६) * १८९७९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देऊळगावराजा (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्याने मुलीच्या लग्नाचा खर्च भागविण्याच्या चिंतेने दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार मृत शेतकऱ्याच्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी देऊळगावराजा पोलीस ठाणे येथे अ.मृ.नं.१/१६ कलम १७४ जाफौ. प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर मृत शेतकऱ्याच्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्याकडे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**इगतपुरी (जि.नाशिक) शहर/पर्यटन स्थळाचा लोणावळा-खंडाळाच्या धर्तीवर विकास करण्याबाबत**

**(६७) * १८३२१ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १०९५१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्याचा पर्यटन विकासाचा बृहत आराखडा तयार करण्यात येवून या आराखड्यात इगतपुरी तालुका परिसरातील पर्यटनक्षम स्थळाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाच्या प्राथम्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार या आराखड्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत आराखड्याचे अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, इगतपुरी शहर पर्यटन स्थळाचा लोणावळा-खंडाळाच्या धर्तीवर विकास करणेबाबतच्या पर्यटकांच्या मागणीचे अनुषंगाने शासनाचे धोरण काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही प्रस्तावित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर आराखडा राज्य पर्यटन समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या अनधिकृत बांधकामांबाबत**

**(६८) * १६४७५ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांबाबत सात वर्षांपूर्वी दाखल झालेल्या याचिकेसंदर्भात तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयास ६७ हजार ४६७ अनधिकृत बांधकामे असल्याची माहिती यापूर्वी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या रेकॉर्डवर आजमितीस १ लाख ४५ हजार ५३८ मिळकती असून सात प्रभागात ५३ हजार ४३६ मिळकती अधिकृत असून उर्वरित ९२ हजार १०२ मिळकती अनधिकृत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वीच्या ६७ हजार ४६७ अनधिकृत मिळकतीमध्ये नव्याने २४ हजार ६३५ अनधिकृत इमारतींची वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील सात वर्षात वाढलेल्या अनधिकृत मिळकतीबाबत महापालिका प्रशासनाने सदरहू अनधिकृत बेकायदेशीर बांधलेल्या मिळकती निष्कासित करण्याबाबत दिरंगाई केलेली असून कर्तव्यात कसूर करणारे संबंधित प्रभाग क्षेत्र अधिकारी, अनधिकृत बांधकाम विभाग नियंत्रक व महापालिका आयुक्तावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.१०/२००४ च्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी महानगरपालिका क्षेत्रात “अनधिकृत बांधकाम असल्यास त्याविरुद्धच्या कारवाईस बाधा न येता” असा शिक्का मारुन कर आकारणी केलेल्या मिळकतींची संख्या ६७,९२० असल्याची माहिती मा.उच्च न्यायालयास दिली होती.

(२) व (३) माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत महानगरपालिका क्षेत्रात “अनधिकृत बांधकाम असल्यास त्याविरुद्धच्या कारवाईस बाधा न येता” असा शिक्का मारुन कर आकारणी केलेल्या एकूण मिळकतींची संख्या ९२,१०२ आहे. त्यापैकी ६७,४६७ मिळकती सन २००७ पूर्वीच्या आहेत. तर सन २००७ ते माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत २४,६३५ इतक्या मिळकती आहेत.

यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने प्रकरण अद्‌याप न्यायप्रविष्ट असल्याने सन २००७ पर्यंतच्या “अनधिकृत बांधकाम असल्यास त्याविरुद्धच्या कारवाईस बाधा न येता” असा शिक्का मारुन कर आकारणी करण्यात आलेल्या ६७,९२० मिळकतींपैकी ६७,४६७ मिळकतींबाबत अद्‌याप कार्यवाही करण्यात आलेली नाही. उर्वरित ४५३ मिळकतींबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

सन २००७ ते माहे डिसेंबर, २०१५ या कालावधीत "अनधिकृत बांधकाम असल्यास त्याविरुद्धच्या कारवाईस बाधा न येता" असा शिक्का मारुन कर आकारणी करण्यात आलेल्या २४,६३५ इतक्या मिळकती देखील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७८ अंतर्गत अनधिकृत म्हणून घोषित करण्यात आलेल्या नाहीत. मात्र याबाबत कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) "अनधिकृत बांधकाम असल्यास त्याविरुद्धच्या कारवाईस बाधा न येता" असा शिक्का मारुन कर आकारणी केलेल्या ९२,१०२ मिळकती वगळता सन २००७ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १२६०५ इतकी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे महानगरपालिकेकडून पाडण्यात/ निष्कासित करण्यात आली आहेत. तर २७३ अनधिकृत बांधकाम धारक/ अतिक्रमण धारकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या संबंधित तरतूदींअंतर्गत महानगरपालिकेकडून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्यातील नागरी भागात अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या उपाययोजनांनुसार महानगरपालिकेकडून विहित कार्यप्रणालीचा अवलंब करुन अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे वेळोवेळी निष्कासित करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येते.

यासंबंधात कसूर करणा-या पालिका अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर देखील महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

राज्य शासनाने अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार या प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## राज्यातील नवीन नगरपंचायतींना विकासाकरिता अधिक निधी उपलब्ध करण्यात येणार असल्याबाबत

**(६९) * १६९१७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नवीन नगरपंचायतींना विकासाकरिता अधिक निधी सन २०१६-१७ मध्ये उपलब्ध करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती निधी देण्यात आला व या पुढील कालावधीत देण्यात येणार आहे, तसेच कोणकोणत्या कामाकरिता निधी देण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय,

राज्यातील नवीन नगरपंचायतीच्या विकासाकरीता सन २०१६-२०१७ साठी रु.१४० कोटी अर्थसंकल्पित करण्यात आले असून, सन २०१५-२०१६ मध्ये रु.७०.८७ कोटी वितरीत करण्यात आले आहेत. नवीन नगरपंचायती अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचे निकष शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१२ अन्वये विहीत करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील आरक्षित जमिनीवर बांधकामे नियमित करण्याच्या निर्णयाबाबत

**(७०) * १७१२४ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील आरक्षित जमिनीवर सन २००० पर्यंतची झालेली बांधकामे नियमित करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगमनेर (जि.अहमदनगर) नगरपरिषद हद्दीतील जमिनीवर झालेली बांधकामे नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील तरतुदीनूसार १ जानेवारी, २००१ रोजी अस्तित्वात असलेले सर्व गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी पात्र असतील असा निर्णय शासनाने घेतला आहे.
(२) ग्रामीण भागातील गुंठेवारी नियमितकरणासाठी मुदतवाढ देणेबाबत शासनाने दिनांक ३०.१२.२०१४ रोजी सर्व नगरपरिषदा (मुंबई महानगर क्षेत्रातील नगरपरिषदा वगळून) यांना खालील प्रमाणे निदेश दिलेले आहेत.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ च्या कलम ४(१) मध्ये सदर अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल अशा वाढवून दिलेल्या मुदतीत संबंधित भूखंडधारक गुंठेवारी नियमाधीन करण्यासाठी अर्ज करील अशी तरतुद समाविष्ट आहे. तसेच या अधिनियमाचे कलम २० अन्वये या अधिनियमाचे प्रयोजनार्थ, नियोजन प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये पार पाडण्याकरिता नगरपरिषदेच्या बाबतीत मुख्याधिकारी, महानगर पालिकेच्या बाबतीत आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या बाबतीत, एकतर जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी सक्षम आहे. सदर अधिनियमाच्या प्रयोजनार्थ नियोजन प्राधिकरण या शब्दाची व्याख्या कलम २(ग) अंतर्गत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) येथील विविध भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(७१) * १७२२२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे विविध भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने तेथील महिलांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान महापालिकेवर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडीतील पाणी टंचाई निर्माण झालेल्या विविध भागात पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत तसेच पाणीपुरवठा विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस १५० द.ल.लि. प्रतिदिन पाण्याची आवश्यकता आहे. परंतु विविध स्त्रोतातून भिवंडी शहरास ११५ द.ल.लि. इतका पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे.

तसेच यावर्षी सरासरी पेक्षा पाऊस कमी पडल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका, स्टेम प्राधिकरण यांनी पाणी पुरवठा नियोजनाच्या अनुषंगाने पाणी कपात लागु केली असल्याने भिवंडी शहरातील नागरीकांना पाणी कपातीस सामोरे जावे लागत आहे. यामुळे महिलांनी महानगरपालिकेवर मोर्चा काढला होता. ही वस्तुस्थिती आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील चेकदरुर येथे अज्ञात व्यक्तीकडे एक देशी कट्टा व चार जिवंत काडतुसे सापडल्याबाबत**

**(७२) * १७८४४ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील चेकदरुर येथील बसस्थानकाजवळील मैदानामध्ये क्रिकेटचे सामने सुरु असताना एका अज्ञात व्यक्तीकडून एक देशी कट्टा व चार जिवंत काडतुसे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जप्त करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हेगारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करुन त्यांचेवर गोंडपिंपरी, पोलीस ठाणे जिल्हा चंद्रपूर येथे अप क्र. ८/१६ नुसार ३, २५ भा.ह.का.सह १३५ मु.पो.का.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असून सदर गुन्हा सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईंदर महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने सुरु केलेल्या योजनांचा प्रशासनाने अर्थसंकल्पात समावेश न केल्याबाबत**

**(७३) * १८०७८ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने महिलांची स्तन व गर्भाशय तपासणी तसेच गर्भाशय कर्करोग प्रथमोपचार या दोन योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला तसेच आर्थिक तरतुदीची शिफारसही समितीने केली परंतू प्रशासनाने या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश न केल्याने महिलांना त्याचा लाभ होऊ शकला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने दिनांक ०२/०१/२०१५ रोजीच्या बैठकीत पारीत केलेल्या ठराव क्र.१३ द्वारे महिलांच्या स्तन व गर्भाशय तपासणी तसेच गर्भाशय कर्करोग प्रथमोपचार या दोन योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात सदर योजनांकरीता तरतूद करता आली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने केलेल्या उपरोल्लेखित ठरावाच्या अनुषंगाने पालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात महिलांसाठी गर्भाशय कर्करोग उपचार आणि स्तन व गर्भाशय तपासणी यासाठी अनुक्रमे रु.७ लक्ष व रु.५ लक्ष एवढी तरतूद करण्यात आली असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील महागडे प्रकल्प बंद करुन हा निधी अन्य कामांवर खर्च करण्याबाबत**

**(७४) * १८१०२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात राणीच्या बागेचे नुतनीकरण, पवई येथील पक्षी उद्यान, सिंगापूरहून येणारे पेंग्विन स्टेशन अशा अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प झळकत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व प्रकल्पांच्या डेडलाईन सोबत प्रकल्पाच्या खर्चही वाढत गेल्याने महानगरपालिकेच्या तिजोरीवर भार पडत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्ण होऊ न शकणारे व महागडे प्रकल्प बंद करुन हा निधी अन्य कामांवर खर्च करण्याकरिता शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालयाच्या बृहत (मांडणी) आराखड्यास केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून दिनांक ५.१२.२०१२ रोजी अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे.

तसेच, मुंबई पुरातन वास्तुजतन समिती यांच्याकडून सदर प्रकल्पाकरिता ना हरकत माहे डिसेंबर, २०१५ मध्ये प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने सदर प्राणीसंग्रहालयाच्या आधुनिकीकरणाची विकासकामे महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येत आहेत.

या सर्व विकासकामांकरिता एकूण सुमारे रु.३२५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) ते कर्जत (जि.रायगड) या रस्त्यांच्या कामांबाबत

**(७५) * १८२०४ अ‍ॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून कल्याण (जि.ठाणे) ते कर्जत (जि.रायगड) या रु.१२९ कोटीच्या रस्त्याच्या कामास सुरुवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम किती दिवसात पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण ते कर्जत या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामास माहे मार्च, २०१२ मध्ये सुरुवात करण्यात आली हे खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्याचे काम उपलब्ध जागेत माहे मे, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिकेने मागविलेल्या मांडवी आठवडे बाजाराच्या निविदेबाबत**

**(७६) * १९१७४ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेने अपंगासाठी आरक्षित असलेल्या मांडवी आठवडे बाजाराची सन २०१५-१६ ची निविदा ई.प्रणालीने न मागविता वृत्तपत्रातील जाहीर सुचनेव्दारे मागविण्यात आल्याने रद्द केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे सोपारा, आचोळे, तुळंज, पापडी, होळी, गाळवाडा, नायगांव आठवडे बाजारची निविदा ई. प्रणालीने न मागविता वृत्तपत्रातील जाहीरातींच्या आधारे मागविण्यात आल्यानंतरही महानगरपालिकेने मंजूर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपंग प्रवर्गातील निविदा रद्द करुन इतर अनेक प्रकरणी वृत्तपत्रातील जाहीर सुचनेव्दारे मागविण्यात आलेल्या निविदा मंजूर करुन अपंगांवर अन्याय करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून अपंगांवर अन्याय करणाऱ्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१५-१६ करीता वसई-विरार शहर महानगरपालिकेने अपंगासाठी आरक्षित असलेल्या मांडवी आठवडे बाजाराकरिता बाजार कर वसुली ठेका देण्यासाठी निविदा वृत्तपत्र जाहिरातीद्वारे मागविण्यात आली होती.

परंतु निविदेद्वारे ठेका प्रदान करताना शासनाचे ई टेंडर धोरण स्थायी समितीच्या निदर्शनास आल्याने स्थायी समितीने उक्त प्रक्रिया रद्द ठरवून निविदा ई टेंडरद्वारे मागविण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) होय,

स्थायी समितीनी ई-निविदा न मागविता मौजे सोपारा, आचोळे, तुळंज, पापडी, होळी, गाळवाडा, नायगांव आठवडे बाजाराची निविदा वृत्तपत्रात रितसर निविदा सुचना प्रसिध्द करुन आठवडे बाजाराकरिता बाजार कर वसुली ठेका मंजूर केला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अपंगाकरिता राखीव असलेल्या मांडवी आठवडे बाजाराची सन २०१५-१६ करिताची निविदा ई टेंडरद्वारे मागविण्यात आली होती.

या प्रकरणी ई-निविदेद्वारे ठेके का देण्यात आले नाहीत तसेच अपंग नसलेल्या व्यक्तींना सदर ठेका कसा देण्यात आला याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्ह्यात शहरांसह ग्रामीण भागातील शौचालयाचे बांधकाम न केल्याबाबत**

**(७७) * १९१२८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात शहरांसह ग्रामीण भागातील स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरात १०३६ व जिल्ह्यात सुमारे ३००० शौचालय बांधकामासाठीचे अनुदान घेऊनही वाळू उपलब्ध नसणे आणि उपलब्ध असल्यास अतिशय महाग दरात असल्याची, इत्यादी कारणे देऊन शौचालय बांधण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने अनुदान घेऊनही शौचालय न बांधणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) स्वच्छ भारत अभियानांतर्गत जळगाव जिल्ह्यातील चोपडा, एरंडोल, धरणगांव, अंमळनेर या नगरपरिषदांमधील लाभार्थ्यांची वैयक्तिक शौचालयाची बांधकामे वाळू उपलब्ध न झाल्याने काही काळ बंद होती. तथापि आता वाळू उपलब्ध झाल्यामुळे सदर शहरातील वैयक्तिक शौचालयाची बांधकामे सुरु झाली आहेत.

उपरोक्त शहरांव्यतिरिक्त उर्वरित जळगाव जिल्ह्यातील शहरी भागात सदर अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालयाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, ग्रामीण भागात सदर अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी देण्यात येणारे अनुदान शौचालय बांधकाम पूर्ण करुन त्याचा वापर करणाऱ्या लाभार्थ्यांस प्रोत्साहनपर देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सायन (मुंबई) येथील लोकमान्य टिळक रुग्णालयातील**
**अत्यावश्यक सुविधा २४ तास चालू ठेवण्याबाबत**

**(७८) * १४८३७ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन (मुंबई) येथील लोकमान्य टिळक रुग्णालयामध्ये एमआरआय तसेच सिटी स्कॅन अत्यावश्यक सुविधा रात्री ८ नंतर तसेच रविवार व बँक सुट्टीच्या दिवशी बंद ठेवण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे संपूर्ण राज्यातून येणाऱ्या गरीब, मध्यमवर्गीय रुग्णांचे अतोनात हाल होत असून परिणामी रुग्णालयांच्या आसपास असणाऱ्या खाजगी एमआरआय चाचणी सेंटरकडे रात्री-अपरात्री त्यांना जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक भूर्दंड पडतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन अत्यावश्यक सुविधा २४ तास चालू ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लोकमान्य टिळक रुग्णालयात सिटी स्कॅन ही अत्यावश्यक सुविधा रुग्णालयातील तसेच बाहेरून येणाऱ्या सर्व रुग्णांना वर्षातील ३६५ दिवस व २४ तास पुरविण्यात येत आहे.

तथापि, एम.आर.आय.ही सुविधा रविवार व बाहयरुग्ण विभागाच्या सुट्टीचे दिवस वगळता दररोज सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत पुरविण्यात येते.

(२) हे खरे नाही.

रुग्णाला तात्काळ एम.आर.आय. चाचणी करावयास सांगितल्यास ती तात्काळ केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लोकमान्य टिळक रुग्णालयात एम.आर.आय.सुविधा २४ तास चालू ठेवण्यासाठी लगणारा कर्मचारीवृंद (तंत्रज्ञ व इतर) वाढविण्यासाठीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

तसेच, नवीन एम.आर.आय. व सिटी स्कॅन मशीन्स मागविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत महिन्याला सरासरी ४०० नवजात बालकांचा मृत्यू होत असल्याबाबत

**(७९) * १४६९५ श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दर महिन्याला सरासरी ४०० नवजात बालकांचा मृत्यू होत असल्याची आकडेवारी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवजात बाळाच्या संगोपनाच्या प्रशिक्षणाची गरज तसेच त्यांना विविध शिक्षण सक्तीचे करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील नवजात बालकांचे मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, सन २०१५ मध्ये दर महिन्याला सरासरी २३२ नवजात बालकांचे मृत्यू झाले आहेत.

तथापि, सदर मृत्यू उपचाराअभावी होत नसून ते संसर्गजन्य आजार, अतिसार, श्वसनविकार, अकाली जन्म, जन्म श्वासावरोध इत्यादी विविध वैद्यकीय कारणामुळे होत आहेत.

(२) महानगरपालिकेच्या प्रसुतिगृहातील कर्मचारी व गरोदर मातांना बालरोगतज्ञांमार्फत नवजात बाळाच्या संगोपनाचे वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते.

(३) नवजात बालक मृत्यू प्रमाण कमी करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

**१. प्राथमिक स्तर :-**

महानगरपालिकेच्या २०४ आरोग्य केंद्र, १७१ दवाखाने, २९ प्रसुतिगृहे व २१ प्रसुतिपश्चात केंद्राद्वारे खालील सेवा दिल्या जातात.

गरोदर मातांचे लवकरात लवकर नोंदणी व लसीकरण केले जाते.

प्रसुतिपूर्व व प्रसुतिपश्चात नियमित आरोग्य तपासणी व उपचार करण्यात येतात.

जन्मानंतर अर्ध्या तासाच्या आत नवजात बालकास स्तनपान सुरु करणे, तसेच पहिल्या सहा महिन्यापर्यंत केवळ स्तनपान व नंतर पूरक आहार देण्याबाबत माहिती सांगण्यात येते.

गरोदर मातांना सकस आहार व वैयक्तिक स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले जाते.

प्रसुतीपूर्व व प्रसुतिपश्चात लोहयुक्त गोळ्यांचा पुरवठा करण्यात येतो.

अति जोखमीच्या गरोदर मातांना प्रमुख रुग्णालयांमध्ये संदर्भित करुन उपचार घेण्यास प्रवृत्त करण्यात येते.

पाच वर्षाखालील मुलांचे नियमित व संपूर्ण लसीकरण करण्यात येते.

पाच वर्षाखालील मुलांना जीवनसत्व ‘अ’ व जंतनाशक गोळ्यांचे नियमित वाटप करण्यात येते.

आरोग्य केंद्रातील स्वयंसेविकांमार्फत पाच वर्षाखालील मुलांच्या संसर्गजन्य रोग, अतिसार व कमी वजनाचे बाळ इत्यादी बाबींचे सर्वेक्षण करून सदर बालकांना महानगरपालिकेच्या दवाखाना /प्रसुतिगृह / उपनगरीय रुग्णालय / वैद्यकीय महाविद्यालय येथे संदर्भित करण्यात येते.

अतिसार असलेल्या बालकास जीवनरक्षक घोळ (ORS) दिले जाते व आवश्यकतेप्रमाणे संदर्भित करण्यात येते.

तसेच, महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र, दवाखाने व प्रसुतिगृहातील बाह्यरुग्ण सेवेद्वारे सर्व बालरुग्णांवर निदान व उपचार करण्यात येतात.

**२. द्वितीय स्तर :-**

महानगरपालिकेच्या २९ प्रसुतिगृहात सर्वसामान्य बालरुग्णांसाठी १४० खाटा व अति जोखमीच्या नवजात बालकांसाठी २० नवजात शिशु काळजी कक्ष (SNSU) व १० नवजात शिशु अतिदक्षता विभाग (NICU) खाटांची सुविधा उपलब्ध आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत माता मृत्यू, उपजत अर्भक मृत्यू व बालकृत्यू समीक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या असून, दरमहा माता मृत्यू उपजत अर्भक मृत्यू व बालमृत्यूचे विश्लेषण करुन संबंधितांना उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

**३. तृतीय स्तर :-**

महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांत सर्वसामान्य बालरुग्णांसाठी ३१२ खाटा व अति जोखमीच्या नवजात बालकांसाठी ६ शिशु अतिदक्षता विभाग (PICU) व ४४ नवजात शिशु अतिदक्षता विभाग (NICU) खाटांची सुविधा उपलब्ध आहे.

महापालिकेच्या ४ वैद्यकीय महाविद्यालयात सर्वसामान्य बालरुग्णांसाठी ३८५ खाटा व अति जोखमीच्या नवजात बालकांसाठी २७ शिशु अतिदक्षता विभाग (PICU), १३७ नवजात शिशु अतिदक्षता विभाग (NICU) व २३ सर्जिकल शिशु अतिदक्षता विभाग (PICU) खाटांची सुविधा उपलब्ध आहे.

बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी महापालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

नियमित लसीकरण कार्यक्रम अंतर्गत लसीकरणाद्वारे टाळता येणाऱ्या आजारासाठी बी.सी.जी.,पालिओ, ट्रिपली, ग्रोवर, हिपटायटिस-बी या लसी पात्र बालकांना देण्यात येतात.

जननी सुरक्षा योजनेंतर्गत मातांची प्रसुती संस्थेत होण्यासाठी त्यांना आर्थिक लाभ देण्यात येतो.

जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत तपासणी, प्रयोगशाळा चाचण्या, उपचार, आहार, वाहतूक या सर्व सेवा माता व शिशुंना मोफत देण्यात येतात.

नवजात आजारी बालकांची विशेष काळजी घेण्यासाठी नवजात शिशु विशेष काळजी कक्ष (SNCU)

बालमृत्यू अन्वेषण व धोरणात्मक निर्णय

गर्भवती मातांची लवकरात लवकर १२ आठवड्याचे आत नोंदणी करुन त्यांना धनुर्वात प्रतिबंधक लस, लोह गोळ्या देण्यात येतात.

प्रत्येक गर्भवती मातांची गरोदरपणात नोंदणीसहीत ५ वेळा तपासणी करण्यात येते.

शासनाची जननी शिशु सुरक्षा योजना राबविली जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ४ वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न प्रमुख रुग्णालयांमध्ये महाविद्यालये व संलग्न प्रमुख रुग्णालयांमध्ये बालरोग व नवजात शिशु विभागांमध्ये मिळून एकूण ११७ तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध आहेत.

-----------------

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.चे विभाजन करुन महापालिकांच्या स्वंतत्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्था समित्या निर्माण करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(८०) * १८४१८ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.चे विभाजन करुन पूर्वीप्रमाणेच दोन्ही महापालिकांच्या स्वंतत्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्था समित्या निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेणे योग्य होईल म्हणून सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने दोन्ही महापालिकांच्या स्वतंत्र सार्वजनिक वाहतुक व्यवस्था समित्या निर्माण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. चे विलिनीकरण रद्द करुन पुर्वीप्रमाणेच दोन्ही महापालिकांच्या स्वतंत्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रस्ताव असल्याने, त्याबाबत आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

**मुंबई महापालिकेच्यावतीने अशुद्ध पाणी पुरवठा करण्यात येत असल्याबाबत**

**(८१) * १७२६८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक १२२५४ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्यावतीने पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यापैंकी ८ टक्के पाणी दूषित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पाणी पुरवठ्यातील २ टक्के पाण्यात ई-कोलाय हा विषाणू निदर्शनास आला असून हे विषाणू असलेले पाणी नरिमन पॉईन्ट, ग्रँट रोड, लोअर परळ, मुलूंड इत्यादी भागात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दूषित पाण्यावर प्रक्रिया करुन नागरिकांना शुध्द पाणी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दररोज वितरीत केल्या जाणाऱ्या पाण्याचे जलाशय व जलवितरण व्यवस्थेत माहे डिसेंबर, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या नमुन्यांपैकी ४.८२ टक्के नमुने पिण्यास अयोग्य आढळले होते.
(२) हे खरे नाही.

डिसेंबर, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या नमुन्यांपैकी १.०३ टक्के नमुन्यांमध्ये ई-कोलाय जीवाणू आढळून आले होते.

नरीमन पॉईंट, ग्रांट रोड, लोअर परळ, मुलुंड हे भाग अनुक्रमे ए.डी.जी./दक्षिण आणि टी विभाग या महानगरपालिकेच्या विभागात येतात.

या विभागांमध्ये माहे डिसेंबर, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या नमुन्यांपैकी ई-कोलाय जीवाणू असलेल्या नमुन्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| ए विभाग | - | १.३०% |
| बी विभाग | - | ०.००% |
| जी/दक्षिण विभाग | - | ०.००% |
| टी विभाग | - | ०.००% |

(३) तुळशी, विहार, तानसा, वैतरणा (मोडकसागर), मध्य वैतरणा हे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील तलाव तसेच ऊर्ध्व वैतरणा व भातसा हे शासनाच्या अखत्यारीतील दोन तलाव असे मिळून एकूण सात तलाव हे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा करण्याकरिता मुख्य पाण्याचे स्त्रोत म्हणून वापरले जातात.

या मुख्य स्त्रोतातून घेण्यात आलेले पाणी हे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी स्थित शुध्दीकरण केंद्रात शुध्द केले जाते. यासाठी महानगरपालिकेची भांडुप संकुल, पांजरापूर संकुल तसेच तुळशी व विहार येथील शुध्दीकरण केंद्रे २४ तास कार्यरत आहेत.

या केंद्रामध्ये निवळणे (Sedimentation) जळगाळणी (Filteration) व हरिणीकरण (Chlorination) या मान्यताप्राप्त क्रियाद्वारे जलशुध्दीकरण आयएस- १०५०० १९९१ या भारतीय मानकातील निकषाप्रमाणे केले जाते. सदर शुध्दीकरण केंद्रामधील प्रयोगशाळेत दर तासाला पाण्याची चाचणी करुन पाण्याच्या योग्यतेची खात्री केली जाते. तसेच महानगरपालिकेच्या विविध जलाशयांमध्ये पुन्हा हरिणीकरण करुन पाण्याच्या शुध्दतेबाबत योग्य नियंत्रण ठेवले जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दुषित पाण्याची तक्रार आल्यास, संबंधित परिसर विभागीय स्तरावर देखरेखीखाली ठेवण्यात येतो. पाणी पुरवठ्याच्या वेळी सदर परिसर नियंत्रण करुन दुषित पाणी फायर हायड्रंट किंवा फ्लशिंग पॉईंटद्वारे संपूर्णपणे बाहेर काढण्यात येते. पाणी गळतीची अचूक जागा शोधून ती दुरुस्त करण्यात येते.

तसेच, सदर परिसरामध्ये गळती दुरुस्त केल्यानंतर त्या ठिकाणच्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणी करुन पुरवठा करण्यात आलेले पाणी पिण्यायोग्य आहे याची खात्री करुन, नंतरच जलजोडणी ग्राहकांना पाणी पुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाहनतळाच्या करारात जाचक अटी टाकल्याबाबत**

**(८२) * १७४८३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूखंडासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने दिनांक १३ मार्च, २००७ रोजी वा त्यासुमारास आर.जी.वन.ए. या ३७,२५२ चौ.मी.च्या रिलायन्स या कंपनी बरोबर करार करून त्यांना सदर जागा वाहनतळ व सार्वजनिक उद्यान तयार करण्यास दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी करार करताना "राईट टू फर्स्ट रिफ्यूजल" ही अट करारात टाकल्याने बांधून झालेला वाहनतळ चालविण्याकरिता अन्य कोणतीही कंपनी करारात असलेल्या या जाचक अटीमुळे वाहनतळ चालविण्यास तयार नसल्याची बाब दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ८० वर्षांकरिता रूपये ११ लाख भरून ३७ हजार चौ.मी. जागा रिलायन्स कंपनीला देताना "राईट टू फर्स्ट रिफ्यूजल" या अटीचा समावेश करून भविष्यात रिलायन्स कंपनीचा कोट्यवधी रूपयांचा फायदा करून देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली तसेच गत अनेक वर्षांपासून तयार होऊन उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असलेल्या एक हजार गाड्यांच्या वाहनतळाचे उद्घाटन व वापर कधी सुरू होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील आर.जी.वन.ए. या ३७,२५२ चौ.मी.च्या भूखंडासाठी मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड या कंपनीबरोबर दिनांक १३ जुलै, २००७ रोजी भाडेपट्टाकरार करुन त्यांना सदर जागा जमिनीखाली जास्तीत जास्त ६७,०९२ चौ.मी. किंवा २००० गाड्यासाठी वाहनतळ बांधून जमिनीवर ३७,२५२ चौ.मी. क्षेत्रावर बगीचा तयार करण्यास दिली आहे.

सदर वाहनतळापैकी ५०% क्षेत्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सुविधेसह विनामूल्य देऊन जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा बगिचा बांधून त्याची देखभाल व व्यवस्थापन निविदाकाराने स्वखर्चाने करावयाची आहे.

सदर आर.जी.वन.ए. हया भूखंडासाठी निविदा सन २००७ साली मागविल्या होत्या. सदर निविदा पुस्तीकेच्या कलम ४.१३(ड) प्रमाणे असे नमूद केले आहे की, निविदेमधील अटी व शर्तीनुसार आर.जी.वन.ए. व त्याखालील वाहनतळाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाने त्यांच्या ३३,५४६ चौ.मी.बांधकाम क्षेत्रासाठी वाहनतळाचे व्यवस्थापन करण्यास निविदा मागविल्या जातील व निविदेमध्ये प्राप्त झालेली उच्चतम रक्कम, यशस्वी निविदाकारास म्हणजेच आर.जी.वन.ए.चे बांधकाम करणा-याला कळविण्यात येईल व त्यास अश्याप्रकारे "राईट टू फर्स्ट रिफ्युजल" प्राप्त होईल. ही अट मूळ आर.जी.वन.ए. चे या भूखंडाच्या निविदेमध्ये नमुद आहे. ही अट कुठल्याही वैशिष्ट्यपूर्ण

निविदाकारास उद्देशुन नसुन हयाबाबतचे हक्क आर.जी.वन.ए.चे बांधकाम करणाऱ्या यशस्वी निविदाकारास अनुज्ञेय आहेत.

सदर ठिकाणी बगिचा व वाहनतळाचे काम पूर्ण झाल्यानंतर निविदाकाराकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विनामूल्य मिळालेल्या ३३५४६ चौ.मी. (१००० पार्किग) क्षेत्रावर वाहनतळ चालविण्यासाठी तीन वेळा निविदा मागविल्या असता निविदा प्राप्त झाल्या नाहीत. तथापि, सदर निविदेच्या अटीमध्ये फेरबदल करुन पुन्हा नव्याने निविदा मागविण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर विचाराधिन आहे.

-----------------

## मुंबई पोर्ट बंदरात उतरवला जाणारा कोळसा धरमतर बंदराकडे वळविण्यात आल्याबाबत

**(८३) * १६४३६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट येथील अत्याधुनिक कंटेनर टर्मिनल बंद केल्यानंतर या बंदरात उतरवला जाणारा कोळसा धरमतर बंदराकडे वळविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयास पोर्ट ट्रस्टच्या विश्वस्तांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयामुळे शासनाला ३५० ते ४०० कोटी रुपयांचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई पोर्ट ट्रस्ट हे विश्वस्त मंडळ केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टचे हाजी बंदर हे अत्याधुनिक कंटेनर टर्मिनल नाही. या बंदरातून औष्णिक कोळश्याची हाताळणी दि. ३०.१०.२०१५ पर्यंत केली जात होती. धरमतर बंदरात पूर्वीपासून मुंबई पोर्टचा मिड स्ट्रीम मध्ये उतरणारा कोळसा हाताळला जातो.

(२) व (३) हे खरे नाही.

हाजी बंदर येथून कोळसा हाताळणी करण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने घातलेल्या अटी व शर्तीनुसार मॅकेनाईज क्लोज कोल हॅन्डलींग टर्मिनल मुंबई पोर्ट ट्रस्टने उभारावयाचा होता. टर्मिनल उभारणीस रु. ४५०.०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. सदरहू खर्च मुंबई पोर्ट ट्रस्टला आर्थिक दृष्टया परवडणारे नसल्याने, हाजी बंदर येथून कोळसा हाताळणी बंद करण्याचा निर्णय ठराव क्र. ६०, दि. १३.८.२०१५ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विश्वस्तांद्वारे घेण्यात आला.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुण्यातील कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशकाने घटस्फोट मिळवून देण्यासाठी पैशाची मागणी केल्याबाबत**

**(८४) * १५८३९ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशकाने घटस्फोट मिळवून देण्यासाठी एका महिलेकडून १० हजार रुपयांची मागणी केल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ या दुसऱ्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेने याबाबत बार असोसिऐशनकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर समुपदेशकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर लेखी तक्रार कौटुंबिक न्यायालय, पुणे यांचेमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आली आहे.

(४) कौटुंबिक न्यायालय, पुणे यांच्या आदेश क्र.आस्था/१०/२०१६, दिनांक ११.०१.२०१६ अन्वये संबंधित समुपदेशकाकडून समुपदेशनाचे सर्व काम पुढील आदेश होईपर्यंत काढून घेण्यात आले आहे तसेच पुढील आदेश होईपर्यंत त्यांच्याकडे कोणतेही समुपदेशनाचे काम वर्ग करण्यात येऊ नये असेही आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भायखळा (मुंबई) येथील राखीव असलेला भूखंड विकासकाला पुनर्विकासासाठी नियमबाह्य पध्दतीने देण्यात आल्याबाबत

**(८५) * १६८२९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील डिव्हीजन कॅटल पॉण्ड गार्लिक कंपाउंड येथील भूखंड एका विकासकाला पुनर्विकासासाठी नियमबाह्य पध्दतीने देण्यास मदत करणाऱ्या श्री.भाऊसाहेब कोळेकर यांना मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याला प्रशासनाने फक्त पाच हजाराचा दंड ठोठावून सोडून दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागा ही खेळाचे मैदान व उद्यानाकरिता राखीव होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरील भूखंड नियमबाह्य पध्दतीने विकासकाला देण्यास मदत करणाऱ्या ई-विभागाच्या तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भायखळा डिव्हीजन कॅटल पॉण्ड गार्लिक कंपाऊंड येथील भूभाग क्र.१९७०, १/१९७०, २/१९७० वरील विकास नियंत्रण नियमावली ३३(७) नुसार पुनर्विकासाचा प्रस्ताव सागरीका को.ऑ. सोसायटी (प्रस्तावित) व स्पिनींग वर्ड इंटरप्रायझेस या विकासकाकडून दिनांक २८.११.२००६ रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महापालिका भाडेकरुंची शोध यादी (Inventory) तयार करण्याकरिता प्रस्ताव सहाय्यक आयुक्त “ई” विभाग यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

प्रस्तावाच्या आवश्यकतेनुसार व महापालिकेच्या धोरणानुसार कमीत कमी एकतरी निवासी भाडेकरु व एकूण कमीतकमी १० भाडेकरु आवश्यक असतात. सदर प्रस्तावातील वाणिज्य भाडेकरुस रहिवाशी भाडेकरु दाखविण्यात आल्यामुळे, सदर प्रकरणी करण्यात आलेल्या खात्यांतर्गत चौकशीमध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालिन सहाय्यक आयुक्त (सेवानिवृत्त) यांना शिक्षा म्हणून रु.५०००/- इतकी रक्कम त्यांच्या मासिक निवृत्ती वेतनापासून एकरकमी काढून घेण्यात यावी असे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पारित केले आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर पुनर्रचित विकास आराखड्यानुसार भूभाग क्रमांक १९७०, १/१९७०, २/१९७० चा बहुतांश भाग मनोरंजनाचे मैदान म्हणून आरक्षित आहे.

सागरीका को.ऑ.सोसायटी (प्रस्तावित) या नावाने सादर करण्यात आलेल्या पुनर्विकासाच्या प्रस्तावामध्ये विकास नियंत्रण नियमावलीतील ३३(७) मध्ये तरतुदींची पूर्तता होत नसल्याने सदर प्रस्तावास कोणतीही मंजूरी न देता सदर प्रस्ताव दि.३०.१०.२००७ रोजी दफ्तरी दाखल करण्यात आलेला आहे.

(३) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या खात्यांतर्गत चौकशीमध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त (सेवानिवृत्त) यांना शिक्षा म्हणून ५०००/- इतकी रक्कम त्यांच्या मासिक निवृत्ती आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पारित केले आहेत.

सदर शिक्षेसाठी स्थायी समिती / महानगरपालिका यांची सक्षम प्राधिकारी म्हणून मंजुरी घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच, प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीमध्ये इतर ११ अधिकारी / कर्मचारी देखील दोषी आढळले असून, त्यांच्यावर आयुक्तांच्या आदेशानुसार शिक्षादेश बजावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील गदिमा स्मारकाबाबत

**(८६) * १५०९७ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने गदिमा स्मारकारची सन २००७ मध्ये केलेल्या घोषणेसंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील स्मारक उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, या स्मारकाकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

कै. ग.दि.माडगूळकर स्मारकासाठी पुणे महानगरपालिकेने सन २००८-०९ ते सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक अंदाजपत्रकात एकुण ९.९२ कोटी इतकी तरतूद केली होती.

तथापि, स्मारक व उद्यानासाठी आवश्यक जागा अद्याप पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित न झाल्यामुळे स्मारक उभारण्याची कार्यवाही प्रलंबित आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) स्मारकासाठी आवश्यक जागेच्या हस्तांतरणासाठी पुणे महानगरपालिकेकडून जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागा / मिळकती पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात न आल्याने स्मारकाच्या कामास विलंब झालेला आहे.

-----------------

**शनिशिंगणापूर (जि.अहमदनगर) येथील शनैश्वर मंदिरात महिलांना बंदी केल्याबाबत**

**(८७) * १७६४२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शनिशिंगणापूर (जि.अहमदनगर) येथील शनैश्वर मंदिर ट्रस्टच्या नवनियुक्त महिला अध्यक्षा अनिला शेटे यांनी दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मंदिराच्या चौथऱ्यावर प्रवेश न देण्याची परंपरा पाळणार असल्याचे जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच घटनेने महिलांना केरळ येथील शबरीमला मंदिरात प्रवेश नाकारण्याच्या विरोधात याचिकेच्या सुनावणीच्या वेळी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास राज्य घटनेत असा अधिकार दिलेला नसल्यास प्रवेश रोखता येणार नाही असे स्पष्ट मत नोंदविले असल्याने शनैश्वर मंदिरात राज्य घटनेच्या कोणत्या कलमाने महिलांना प्रवेश रोखला जात आहे,

(३) असल्यास, राज्य घटनेत महिलांना प्रवेश बंदी नसल्यास शनैश्वरच्या नवनियुक्त समितीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) शनि मंदिरामध्ये सर्व स्त्री व पुरुषांना प्रवेश खुला आहे.

परंतु, शनि चौथऱ्यावर सर्व स्त्री व पुरुषांना जाता येणार नाही असा ठराव विश्वस्त मंडळाने दि.९.२.२०११ रोजी पारित केला आहे. असा ठराव पास करण्याचे कारण असे आहे की, भाविक ओल्या वस्त्राने दर्शन घेताना शनि मुर्तीस दोन्ही हाताने स्पर्श करुन पूर्ण भार मूर्तीवर टाकतात, तसेच सोबत आणलेले पूजा साहित्य लोखंडी नाल, यंत्र, अंगठी इ. शनि मुर्तीस घासतात. त्यामुळे मूर्तीची मोठ्या प्रमाणावर झीज होत आहे. तसेच भाविक जास्त वेळ मूर्तीजवळ थांबत असल्याने चौथऱ्यावर गर्दी होते व जे भाविक चौथऱ्याखालून दर्शन घेऊ इच्छितात त्यांना मूर्ती दिसत नाही. तसेच शनिमूर्तीवर तेलाचा अभिषेक करण्यात येत असल्याने, चौथऱ्यावरील फरशीवर तेल सांडलेले असते. त्यामुळे भाविक पाय घसरून पडण्याची शक्यता असते.

अशा प्रकारे संभाव्य चेंगराचेंगरी रोखण्यासाठी व सर्वांना सुलभपणे दर्शन घेणे सोयीचे व्हावे यासाठी सर्व भाविकांना शनिदेवाच्या चौथऱ्याखालून दर्शन सुरु करुन, शनिदेवाच्या पूजेसाठी न्यासाचे अधिकृत पुजारी चौथऱ्यावर थांबून भाविकांनी आणलेले तेल, पूजा साहित्य घेवून मूर्तीस चढवतील असा ठराव विश्वस्त मंडळाने केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दिवा (जि.ठाणे) येथील विनापरवाना सुरु असलेले डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याबाबत**

**(८८) * १६३५५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) येथील डम्पिंग ग्राऊंडचा विनापरवाना वापर सुरु असून घनकचरा व्यवस्थापनाची नियमावली डावलली जात असून अशी बेकायदा डम्पिंग ग्राऊंड त्वरित बंद करण्याबाबतचे आदेश देत मा.उच्च न्यायालयाने एक आठवड्यात शपथपत्र सादर करण्याचे आदेश महापालिकेला माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डम्पिंग ग्राऊंड बंद केल्याचे शपथपत्र महापालिकेने शासनास दिले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जनहित याचिका क्र.१३९/२०१५ व ८०५३/२०१५ या याचिका मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ठाणे महानगरपालिकेने दिनांक ११.३.२०१६ रोजी शपथपत्र दाखल केलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथे टाटा मेमोरियल संस्थेच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत**

**(८९) * १४९९८ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८८९ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे टाटा मेमोरियल संस्थेच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णांसाठी कर्करोग रुग्णालय उभारण्यात येत असल्याचे दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर कॅन्सर रुग्णालयासाठी जागेची पाहणी करुन जागा निश्चिती करण्याकरिता माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये टाटा मेमोरियल सेंटर व्यवस्थापनास कळविल्यानंतर, जागेच्या निश्चितीबाबत त्यांचेकडून ठाणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) त्यानुसार कॅन्सर रुग्णालय उभारणीसाठी कोणती जागा निश्चित करण्यात आली आहे व त्यानुसार याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, दिनांक ४.१२.२०१५ रोजी टाटा मेमोरियल सेंटर यांचेमार्फत ठाणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(३) टाटा मेमोरियल सेंटर यास जागा पाहणी करुन जागा निश्चिती करण्याकरिता दिनांक ९.११.२०१५ रोजी कळविण्यात आले. तसेच क्लॅरियंट कंपनी, कोलशेतचे विकास प्रस्तावात प्राप्त होणारे सुविधा भूखंडाचे क्षेत्रापैकी भूखंड देण्याची प्राथमिक तयारी ठाणे महानगरपालिकेने केली होती.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी संबंधित भुखंडाचे विकासक यांनी सदर सुविधा भुखंडाचा ताबा ठाणे महानगरपालिकेस न देता विकास आराखडयातील रस्त्याचे क्षेत्रफळ सुविधा भूखंडात समाविष्ट करुन मंजूर नकाशात दर्शविलेले सुविधा भूखंड क्षेत्र कमी करण्याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असल्याने सदर भूखंड ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात अद्याप न आल्यामुळे कार्यवाही प्रलंबित आहे.

-----------------

**उरण भेंडखळ येथील बीपीसीएल कंपनीमध्ये प्रोपेन व ब्यूटेन या दोन टाक्यांपैकी एक टाकी लिकेज झाल्याबाबत**

**(९०) * १४७८१ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण भेंडखळ येथील बीपीसीएल कंपनीत असलेल्या प्रोपेन व ब्यूटेन साठविण्यासाठी असणा-या ८००० मेट्रीक टन क्षमतेच्या दोन टाक्यांपैकी एक टाकी लिकेज झाली असून येथे गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने श्रमजीवी पत्रकार संघटना यांनी यासंदर्भात उरण तहसिलदार व उरण पोलीस ठाणे यांच्याकडे तक्रार दाखल केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर टाकीची दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (भेंडखळ, ता.उरण, जिल्हा रायगड) या कारखान्यातील प्रोपेन व ब्युटेन हे पेट्रोलियम पदार्थ साठविण्यासाठी असणाऱ्या ८००० मेट्रीक टन क्षमतेच्या दोन टाक्यांपैकी एकही टाकी लिकेज झालेली नाही. तथापि, श्रमजीवी पत्रकार संघ यांनी उरण तहसिलदार व पोलीस विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये तक्रार दाखल केलेली आहे.

(२) सदर तक्रारीची चौकशी दिनांक २४.०९.२०१५ रोजी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने केली असून त्यात असे आढळून आले की, या कारखान्यात उणे तापमानात प्रोपेन व ब्युटेन हे वायू साठविण्यासाठी ८००० मेट्रीक टन क्षमतेच्या दोन क्रायोजनिक टाक्या आहेत.

यापैकी एक टाकी नियतकालिक देखभालीसाठी रिकामी करुन त्यातील सबमर्सिबल पंप सर्व्हिसिंगचे काम माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान तज्ञांमार्फत करण्यात आले आहे. सदर कारखान्यात कोणतीही टाकी लिकेज झाली नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे बिजभांडवल योजनेचे अर्ज ऑनलाईन भरतेवेळी वेबसाईट हँग झाल्याबाबत**

**(९१) * १९१४९ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र रोजगार व स्वंयरोजगार विभागांतर्गत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे बिजभांडवल योजनेचे राज्यभरातील अर्ज ऑनलाईन भरण्याच्या सूचना सदरील विभागाने दिल्या होत्या त्यानुसार लाभार्थ्यांनी सदरील अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी त्या वेबसाईटवर गेले असता त्यांना सदरील वेबसाईट हँग झाल्याचे निदर्शनास आले व हजारो लाभार्थ्यांना त्याचा फटका बसल्याची बाब माहे डिसेंबर-२०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखालील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे वेबपोर्टल mahaswaymrojgar.maharastra.gov.in च्या हाताळणी मध्ये लाभार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत वेबपोर्टल निर्माण करणाऱ्या कंपनीकडून संबंधित अडचणीचे निराकरण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) येथील पोलीस ठाण्यात आरोपीचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याबाबत

**(९२) * १६५३१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) पोलिसांनी श्री.लक्ष्मण गोविंद बडे रा. कासार, बीड या आरोपीला खोटे साक्षीदार उभे करून जमिनीची विक्री केल्याप्रकरणी फसवणुकीच्या गुन्ह्यात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाने दिनांक २८ डिसेंबर, २०१५ पर्यंत आरोपीस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आरोपीचा दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास पोलीस कोठडीत मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आरोपीचा पोलीस कोठडीत मृत्यू निश्चित कोणत्या कारणाने झाला यासंदर्भात शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पेण (जि.रायगड) पोलीस ठाण्यामध्ये लक्ष्मण गोविंद बडे रा.मु, भाल, पो.थळ, ता.अलिबाग, जि.रायगड यास दिनांक २१.१२.२०१५ रोजी गु.रजि.नं. ८७/२०१५ भा.द.वि.कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, १८२, ३४ या गुन्ह्यात अटक केली होती.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) पोलीस कोठडीतील मृत्यूच्या अनुषंगाने शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला असून यातील मयताचे व्हिसेरा अहवाल, हिस्टोपॅथोलॉजी अहवाल हे संबंधितांकडून प्राप्त झाले नसल्याने मयताचे मृत्यूच्या कारणाबाबतचा अंतिम अहवाल वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**नवी मुंबईतील खांदेश्वर येथे ड्रग्ज विकणा-या नायझेरियन टोळीला पोलिसांनी पकडल्याबाबत**

**(९३) * १७३५५ श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खांदेश्वर येथे आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली ड्रग्ज विकून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या नायझेरियन टोळीला येथील पोलिसांनी पकडले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित टोळीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) फिर्यादीने केलेल्या तक्रारीवरुन गुन्ह्यातील अटक आरोपी यांनी आपसात संगनमत करुन अस्तित्वात नसलेल्या कोमासिड्स कंपनीची माहिती देवून आयुर्वेदिक औषधाकरिता लागणारे कोमा सिड्स विकत घेण्यास भाग पाडून फसवणूक केलेबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर न. ४/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४८९ सी सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ क, ६६ ड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये ३ नायझेरीयन नागरिक आहेत.

आरोपींकडून जप्त केलेले कोमासिड्स हे आफ्रिकन जंगली आंब्याचे बी आहे. त्याचा उपयोग आफ्रिकेमध्ये सूप बनविण्याकरिता करण्यात येत असून ते आफ्रिकेमध्ये सुमारे ३२०/- रु. प्रति किलो ग्रॅमने विकले जाते.

सदर आरोपींकडून वेगवेगळ्या कंपनीचे २ लॅपटॉप, वेगवेगळ्या कंपनीचे ३१ मोबाईल फोन्स, वेगवेगळ्या कंपनीचे २६ सिमकार्डस, पेनड्राईव्ह, इंटरनेटचे डोंगल, असा एकूण रु. १,७०,०००/- किंमतीचा माल व बनावट नोटा (अमेरिकन डॉलर्स भारतीय किंमत अंदाजे रु. २६,५०,०००/-) तसेच कोमा सीड्सची ५५ पाकिटे जप्त करण्यात आलेली आहेत. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्पवृक्ष मार्केटिंग कंपनीची मालमत्ता विक्री करुन गुंतवणुकदारांचे पैसे परत करण्याबाबत

**(९४) * १६४९० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १३ लाख गुंतवणूकदारांची फसवणूक करणा-या ठाणे येथील कल्पवृक्ष मार्केटिंग कंपनीची मालमत्ता विक्री करुन गुंतवणुकदारांचे पैसे परत करण्याचे आदेश ठाणे जिल्हा न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाने आदेश देऊनही कल्पवृक्ष कंपनीची मालमत्ता विक्री करण्यास शासनाकडून जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी न्यायालयात गैरहजर राहत असल्याने गुंतवणुकदारांचे पैसे मिळण्यास विलंब होत असल्याने या प्रकरणी मा.गृह राज्यमंत्री यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांना तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गुंतवणुकदारांची रक्कम परत मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत तात्काळ अहवाल सादर करणेबाबत, मा. राज्यमंत्री (गृह) यांनी दि. २१.०३.२०१६ रोजी सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

(४) सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**धुळे शहरातील कबीरगंज भागात शौचालयांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(९५) * १७१२८ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील (जि.धुळे) कबीरगंज भागात शौचालयांची दुरवस्था झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरुन जनसामान्यात रोगराई पसरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील शौचालयांची नवीकरण करुन दुर्गंधी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धुळे शहरातील कबीरगंज भागात महानगरपालिकेचे १० सीटचे शौचालय आहे. सदर शौचालयाची बारमाही देखभाल दुरुस्ती व स्वच्छता करण्याबाबत सन २०११ पासून खाजगी संस्थेसोबत महानगरपालिकेने करारनामा केला असून, त्यानुसार रु.३००० च्या मर्यादेतील दुरूस्तीचे कामे सदर संस्थेमार्फत करण्यात येतात.

सदर शौचालयांपैकी काही शौचालयांची फरशी, भांडे व आऊटलेट ड्रेनेज नादुरुस्त झाले असल्याने ती दुरूस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर शौचालय सद्यस्थितीत वापरात असून या शौचालयांमुळे रोगराई अथवा साथीचे रोग पसरत असल्याची वस्तुस्थिती नाही.

(२) धुळे महानगरपालिकेमार्फत शहरातील शौचालये दुरुस्ती कामाची जाहिर निविदा दि.१५.९.२०१५ रोजी मागाविण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा दि.११.३.२०१६ रोजी मागविण्यात आली आहे.

फेरनिविदेअंती निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर, शहरातील शौचालये दुरुस्तीची कामे पुर्ण करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भूसंपादनाला विलंब झाल्याने नागपूर महानगरपालिकेवर अतिरिक्त आर्थिक ताण पडल्याबाबत

**(९६) * १७८४६ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरविकास आराखड्यात नागपूर जिल्ह्यातील मौजा पारडी गावातील जमीन स्मशानभुमी व रस्त्यासाठी अधिगृहीत करण्याचा निर्णय माहे मार्च, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीची किंमत तीन वर्षापूर्वी रुपये १२ कोटी होती, परंतु जमीन भूसंपादनाला विलंब झाल्याने महानगरपालिकेला त्या जमिनीसाठी आता ५ पट म्हणजेच रुपये ६१.११ कोटी मोजावे लागणार असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महानगरपालिकेवर पाच पट अतिरिक्त बोजा येणार असल्यामुळे महानगरपालिका आयुक्तांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची सूचना करुन भूसंपादनाचा प्रस्ताव प्रशासनाला परत पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. ८३ दिनांक ०८/०७/२०१३ नुसार मौजा पारडी गावातील जमीन स्मशान भूमी व रस्त्याचे आरक्षणाखालील जागेकरिता अधिग्रहीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

संपादनाधिन जागेसाठी (क्षेत्र ३६,३८०.०० चौ.मी.) अंदाजित किंमत रुपये १२,२८,००,०००/- इतकी रक्कम नागपूर मनपा स्थायी समिती ठराव क्र. ८३ दिनांक ८/७/२०१३ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती व त्यानुसार दिनांक १६/७/२०१३ रोजी नागपूर यांचेकडे सादर करण्यात आला होता.

त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने खाजगी जमीन संपादनासाठी आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव पाठविण्यास कळविले. त्यानुसार सुधारित प्रस्ताव दिनांक २०.११.२०१३ रोजी सादर करण्यात आला.

दरम्यान नवीन भूसंपादन कायदा लागू झाल्याने, यातील तरतुदीनुसार थेट वाटाघाटीद्वारे जमीन घेण्याची कार्यवाही करण्याचे शक्य असल्याचे जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील दिनांक १५.०५.२०१५ रोजीच्या सभेत निर्देशीत करण्यात आले.

त्यानुसार महापालिकेने या प्रक्रियेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विचारणा केली असता, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (सामान्य) यांनी त्यांच्या दिनांक १९/८/२०१५ च्या पत्रानुसार आरक्षणाखालील जागेची थेट वाटाघाटी प्रमाणे रु. ६१,११,८४,०००/- व नियमित भूसंपादनाद्वारे रु. ५८,०५,३८,११६/- ची आकारणी होत असल्याचे कळविले.

तथापि, उपजिल्हाधिकारी भूसंपादन (सामान्य) नागपूर यांचेकडे दिनांक २२/०२/२०१६ च्या नागपूर महापालिकेस प्राप्त पत्रानुसार या जमिनीची थेट वाटाघाटीद्वारे येणारी रक्कम रु.३४,००,३२,०००/- व नियमित भूसंपादनाद्वारे येणारी रक्कम रु. ३२,३०,०८,७९२/- इतकी असल्याचे दिसून येत आहे.

(३) नागपूर महापालिका स्थायी समिती ठराव क्र. ४१२ दिनांक ०८/०१/२०१६ नुसार दिरंगाईमुळे व सदर जागेच्या भूसंपादन मोबदला राशीतील फरकामुळे पडणारा आर्थिक बोजाबाबत चौकशी करण्यास स्थायी समितीने महानगरपालिका प्रशासनाला निर्देश दिले, हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी उपायुक्त (२) नागपूर महानगरपालिका यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून, याबाबत महापालिका प्रशासन स्तरावर दिरंगाई झाल्याचे दिसून आलेले नाही.

सद्य:स्थितीत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (सामान्य) यांचे कार्यालयाच्या दिनांक २२/०२/२०१६च्या पत्रानुसार त्याप्रमाणे फेर आकारणीचा सुधारित प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे. असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथे अंमली पदार्थांच्या वापरास प्रतिबंध करण्याबाबत

**(९७) * १८०८४ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे अंमली पदार्थाचा वापर होत असून ठाणे गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने सन २०१५ मध्ये यासंदर्भात सुमारे ५२ गुन्हे नोंदवून ८८ जणांना अटक केली तर कारवाईत ४२ लाख रूपयांहून अधिक रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून येथील तरूण पिढी अंमली पदार्थांच्या नशेच्या आहारी जाऊ नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) ठाणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये तरुण मुले-मुली व इतर लोक अंमली पदार्थांच्या आहारी जावू नये म्हणून जनजागृती निर्माण होण्याकरीता विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. अंमली पदार्थांचे सेवनापासून परावृत्त होण्याकरीता अशा पदार्थांचे सेवनाने होणारे दुष्परिणाम प्रदर्शन करणारे बॅनर्स, पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

ठाणे, मुंब्रा, कल्याण, डोंबिवली, भिवंडी इ. शहरामध्ये शाळा, कॉलेजमध्ये रॅली, चर्चासत्राचे आयोजन करण्यात येवून त्याद्वारे पालक व विद्यार्थी यांचेशी संपर्क साधून त्यांना अंमली पदार्थांचे सेवनाने होणारे वाईट परिणामांची जाणीव करुन देवून लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. तसेच अंमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क साधून त्यांना अशा मुलांवर योग्य त्या तज्ञाकडे उपचार करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

अंमली पदार्थांच्या विक्री व सेवनास आळा घालणे करीता अंमली पदार्थांची विक्री तसेच सेवन करणाऱ्या इसमांविरुध्द प्रभावीपणे कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर या पथकाकडून लोकांना अंमली पदार्थाचे सेवनापासून परावृत्त होणेसाठी जनजागृती करण्यात येत आहे. तसेच अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या इसमांविरुध्द प्रभावीपणे कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विविध जिल्ह्यातील गुंतवणुकदारांची मैत्रेय या कंपनीने फसवणूक केल्याबाबत**

**(९८) * १८१०६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मैत्रेय कंपनीने जळगाव, नाशिक, धुळे इ. जिल्ह्यात अनेक नागरिकांना अधिक व्याज आणि स्वस्तात प्लॉट या सारखी प्रलोभने दाखवून तसेच सेबी ने व्यवहार बंद करायला सांगताच प्लॉटर्स प्रा.लि. या नावाने गुंतवणूक वळविली तिथेही नोटीस आल्यावर मैत्रेय रिअलटर्स प्रा. लि. ही कंपनी काढून लाखो ठेवीदारांची गुंतवणूक रिअल इस्टेटमध्ये वळविली परंतु, कंपनीने दिलेले परतीचे चेक न वटल्याने व कंपनीच्या सर्व तालुका स्तरावरील कार्यालयाला कुलप लागल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात लक्षात आल्याने लाखो ठेवीदार अडचणीत सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध योजनांच्या माध्यमातून जादा रकमेच्या परताव्याचे अमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्या प्रकरणात नाशिक पोलिसांनी पालघर जिल्ह्यातील माणिकपूरी येथील मैत्रेय या कंपनीच्या कार्यालयावर छापा टाकल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवडयात घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या छापासत्रानुसार व मिळालेल्या कागदपत्रान्वये या कंपनीने किती गुंतवणुकदारांना फसविलेले आहे, तसेच उक्त कंपनीच्या संचालकांची मालमत्ता जप्त करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या गुंतवणुकदारांचे पैसे परत करण्याकरिता तसेच या कंपनीच्या संचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

प्रश्नात नमूद कंपनी विरुध्द प्राप्त फिर्यादीनुसार सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे दि. ४/२/२०१६ रोजी गु.र.नं. ३४/२०१६ भा.दं.वि.कलम ४०६, ४२०, ३४, १२० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढे एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ तसेच PCMSSB कायदा कलम ३, ४, ५, ६ असे वाढीव कलमे लावण्यात आली आहेत.

(२), (३) व (४) होय,

मैत्रेय प्लॉटर्स ॲन्ड स्ट्रक्चर्स प्रा.लि. या कंपनीच्या नवघर, वसई रोड येथील मुख्य कार्यालय तसेच नाशिक येथील विभागीय कार्यालय येथे नाशिक शहर पोलिसांनी छापा मारुन दस्तऐवज व सर्व संगणकातील हार्डडिस्क जप्त करण्यात आल्या आहेत. सदर हार्डडिस्कचे तपासणीचे काम चालु आहे. दि. १८/२/२०१६ पर्यंत एकुण ६६१ ठेविदारांची सुमारे रु. १.४७ कोटी रकमेची फसवणूक झाल्याबाबत तक्रारी प्राप्त आहेत. सदर कंपनी विरुध्द २२/०३/२०१६ पर्यंत १९०० ठेविदारांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त पुराव्याची पुर्ण तपासणी झाल्यानंतरच अपहारीत रकमेची माहिती कळू शकेल.

सदर गुन्ह्यात एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ नुसार कंपनीची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करुन विल्हेवाट लावण्याच्या कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांना अहवाल सादर करण्यात आला आहे.

गुन्ह्यातील आरोपी संचालिका यांना दि.०५/०२/२०१६ रोजी अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार असून त्याला अटक करण्याचे प्रयत्न चालु आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार अटक आरोपीने ESCROW खाते उघडून त्यात रु. १,४७,००,२८०/- रक्कम जमा केली आहे. गुंतवणुकदारांची रक्कम परत करण्याबाबत मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**ठाणे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यासाठी एमएमआरडीए मार्फत उड्डाणपूलांच्या उभारणीचा निर्णय घेतल्याबाबत**

**(९९) * १८२०८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील वाहतूक कोंडी कमी व्हावी यासाठी एमएमआरडीएमार्फत नौपाडा, अल्मेडा चौक, मीनाताई ठाकरे चौक येथे ३ उड्डाणपूलांच्या उभारणीचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उड्डाणपूलांसाठी किती खर्च होणार असून ही कामे केंव्हा पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर कामाचा प्रकल्प खर्च रुपये २२३,६९,६१,००७/- इतका असून उड्डाणपुल बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर काम डिसेंबर, २०१६ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------

## जळगाव महापालिकेने शहरात सुरु केलेल्या दुध केंद्रात अनधिकृत दुकाने उभारण्यात आल्याबाबत

**(१००) * १९१३३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरात जळगाव दुध संघाच्या उत्पादनांकरिता महापालिकेने रस्त्यांवर ठिकठिकाणी दुध केंद्र सुरु केली असून आता मात्र अनेक अनधिकृत केंद्रे उभी राहिली आहेत त्यात किराणा व इतर दुकाने तसेच बाहेरील डेअरींचे दुध विक्री केंद्रे सुद्धा आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

जळगाव महानगरपालिकेने जळगाव शहरात दुध विकास उत्पादक संघाच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी एकूण ८६ दुध केंद्रांना दिनांक १.१.२०१२ ते ३१.१२.२०१६ या कालावधीसाठी मुदतवाढ दिली आहे.

महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार सदर ८६ केंद्रांपैकी ९० टक्के केंद्रांत दुग्धजन्य पदार्थव्यतिरिक्त इतर वस्तूंची विक्री करण्यात येत असल्याचे तसेच ६ दूध केंद्र अनधिकृत असल्याचे आढळून आले आहेत.

(२) दुग्धजन्य पदार्थाव्यतिरिक्त इतर वस्तूंची विक्री करण्यात येत असलेल्या केंद्रांची मान्यता रद्द का करण्यात येऊ नये याबाबत अंतिम नोटीस देऊन पुढील कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

तसेच ६ अनधिकृत दुध केंद्रांच्या निष्कासनाची कार्यवाही महानगरपालिकेकडून प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.